- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४०,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,२६,३५० /-
✔ चांदी : १,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३४ | किंमत : २ रूपये

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

महाराष्ट्राच्या वैधमापनशास्त्र विभागात नेमके चालले तरी काय?

वाहन काट्यांच्या पडताळणीसाठी कोट्यवधींची शासकीय यंत्रणा की केवळ कागदोपत्री व्यवस्था? नागपूर विभागातील कारभारावर गंभीर प्रश्न।

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मुख्यमंत्र्यांच्या नागपूरमध्येच वैधमापनशास्त्र विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह; शासकीय वर्किंग स्टँडर्ड वाहनांचा वापर, बंद गाड्या आणि खासगी वजनांच्या आधारे पडताळणीच्या कथित प्रकारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी!





केंद्र सरकारकडून विभागाला मिळालेल्या कोटींच्या दरातील दोन ओआयएमएल अशाप्रकारे धुळखात पडलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यातील वैधमापनशास्त्र विभाग हा ग्राहकांचे हित जपण्यासाठी, व्यापारी व्यवहारांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी आणि वजनमापांमध्ये होणारी फसवणूक रोखण्यासाठी कार्यरत असलेला महत्त्वाचा शासकीय विभाग आहे. मात्र, याच विभागाच्या कार्यपद्धतीवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेषतः वाहन काटे म्हणजेच वेब्रिजच्या पडताळणी व मुद्रांकनासाठी केंद्र शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या शासकीय वर्किंग स्टँडर्ड वाहनांचा प्रत्यक्ष वापर नेमका किती होतो, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

केंद्र सरकारकडून मिळालेल्या दोन विशेष वाहनांचे नेमके झाले काय?

सन २०११ च्या सुमारास केंद्र सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाच्या वैधमापनशास्त्र विभागाला वाहन काट्यांची पडताळणी व मुद्रांकन करण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. यामध्ये हायड्रॉलिक क्रेनसह सुमारे साडेबारा टन क्षमतेचे वर्किंग स्टँडर्ड असलेले एक वाहन आणि पाच टन क्षमतेचे दुसरे वाहन अशा दोन विशेष वाहनांचा समावेश असल्याचे सांगितले जाते.

या वाहनांचा मुख्य उद्देश म्हणजे प्रत्येक विभागातील वाहन काट्यांची पडताळणी करण्यासाठी आवश्यक असलेली प्रमाणित कार्यकारी मानके उपलब्ध करून देणे. त्यामुळे निरीक्षकांना व्यावसायिक वजनांचा किंवा इतर खासगी साधनांचा आधार घेण्याऐवजी शासनाने पुरविलेल्या अधिकृत व प्रमाणित वर्किंग स्टँडर्डच्या आधारे कायदेशीर पडताळणी करता यावी, ही त्यामागील भूमिका होती. मात्र, या वाहनांचा प्रत्यक्ष वापर किती झाला? कोणत्या विभागात किती वेळा त्यांचा वापर करण्यात आला? कोणत्या अधिकाऱ्यांनी त्यांचा वापर केला? वाहनांचे लॉगबुक काय सांगते? या प्रश्नांची उत्तरे आजही समाधानकारकरीत्या मिळत नसल्याची तक्रार आहे.

नागपूर विभागात वाहन काट्यांची पडताळणी नेमकी कोणत्या वजनाने होते?

सर्वात गंभीर प्रश्न नागपूर विभागाच्या संदर्भात उपस्थित होत आहे. जर शासनाने उपलब्ध करून दिलेली विशेष वर्किंग स्टँडर्ड वाहने बंद अवस्थेत असतील किंवा प्रत्यक्ष कामकाजासाठी वापरात नसतील, तर नागपूर विभागातील वाहन काट्यांची पडताळणी व मुद्रांकन नेमक्या कोणत्या प्रमाणित वजनांच्या आधारे केले जात आहे?

वाहन काट्यांची पडताळणी करण्यासाठी आवश्यक असलेली प्रमाणित कार्यकारी मानके उपलब्ध असताना काही निरीक्षकांकडून कमर्शियल वेट्सचा वापर करून मनमानी पद्धतीने पडताळणी केली जात असल्याच्या तक्रारी आहेत. जर या तक्रारी सत्य असतील, तर हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणाचा विषय नसून वैधमापनशास्त्राच्या संपूर्ण पडताळणी प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण करणारा प्रकार आहे. प्रश्न असा आहे की, शासनाने अधिकृत यंत्रणा उपलब्ध करून दिलेली असताना तिचा वापर का केला जात नाही? आणि केला जात नसेल, तर त्यामागील कारणे कोणती?

शासकीय वाहनांचा वापर टाळण्यामागे नेमका हेतू काय?

या वाहनांच्या लॉगबुकची, वापराच्या नोंदींची, दुरुस्तीच्या खर्चाची आणि प्रत्यक्ष पडताळणीच्या अहवालांची तपासणी झाल्यास अनेक बाबी स्पष्ट होऊ शकतात. काही ठिकाणी या वाहनांचा वापर केवळ निवडक प्रसंगी किंवा ठरावीक कारणांसाठी केला जात असल्याचा आरोप आहे. जर शासकीय वाहनांचा वापर जाणूनबुजून टाळला जात असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? शासकीय यंत्रणा उपलब्ध असूनही तिचा वापर न करता पर्यायी पद्धतीने पडताळणी करण्यामागे कोणते प्रशासकीय किंवा आर्थिक हितसंबंध आहेत का, याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे.

नियमांचे रक्षकच नियमांचे उल्लंघन करत आहेत का?

वाहन काट्यांची पडताळणी ही अत्यंत तांत्रिक आणि कायदेशीर प्रक्रिया आहे. यासाठी योग्य प्रमाणित कार्यकारी मानके, अधिकृत उपकरणे आणि नियमानुसार कार्यपद्धती आवश्यक आहे. अशावेळी काही निरीक्षकांकडून व्यावसायिक वजनांचा वापर करून वाहन काटे व इतर वजनमापांची पडताळणी आणि मुद्रांकन मनमानी पद्धतीने केले जात असल्याचे आरोप समोर येत आहेत.

जर असे प्रकार प्रत्यक्षात घडत असतील, तर त्यातून पडताळणीच्या अचूकतेवर आणि अधिकाऱ्यांच्या निष्पक्षतेवर प्रश्न निर्माण होतात. तसेच या प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार किंवा अनधिकृत आर्थिक लाभ घेतला जात आहे का, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. जे नियम जनतेने आणि व्यापाऱ्यांनी पाळावेत म्हणून विभागाची स्थापना झाली, तेच नियम पाळण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांकडून उल्लंघन होत असेल, तर यापेक्षा मोठी शोकांतिका कोणती?

कामठी विभाग क्रमांक २ मधील निरीक्षकांविरोधातील तक्रारींचे काय झाले?

नागपूर विभागातील कामठी विभाग क्रमांक २ मधील निरीक्षकांविरोधात यापूर्वीही अनेक तक्रारी शासनाकडे करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या तक्रारींच्या अनुषंगाने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली असून काही बाबींमध्ये संबंधित अधिकारी दोषी आढळल्याचा तक्रारदारांचा दावा आहे. असे असतानाही संबंधितांवर ठोस कारवाई का करण्यात आली नाही, हा प्रश्न उपस्थित होत आहे. जर चौकशीमध्ये दोष सिद्ध झाले असतील, तर त्यानुसार विभागीय कारवाई का झाली नाही? चौकशी अहवालावर कोणती कार्यवाही करण्यात आली? संबंधितांना कोणाचे अभय आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे शासनाने जनतेसमोर मांडली पाहिजेत.

माहिती अधिकारातून माहिती मागूनही स्पष्ट उत्तरे का नाहीत?

या संपूर्ण प्रकरणासंदर्भात महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासनाकडे माहिती अधिकार कायद्यांतर्गत वारंवार माहिती मागविण्यात आल्याचे तक्रारदार सांगतात. मात्र, शासकीय वाहनांच्या लॉगबुकची माहिती, प्रत्यक्ष वापर, वाहनांची सद्यस्थिती, कार्यकारी मानकांचा वापर आणि वाहन काट्यांच्या पडताळणीसाठी अवलंबण्यात येणारी अधिकृत प्रक्रिया याबाबत स्पष्ट व समाधानकारक माहिती मिळत नसल्याची तक्रार आहे. माहिती अधिकार कायद्याचा उद्देशच प्रशासनात पारदर्शकता निर्माण करणे हा आहे. मग शासकीय मालमत्तेचा वापर आणि जनतेच्या हितासी संबंधित माहिती देण्यास टाळाटाळ का केली जात आहे?

नागपूर म्हणजे मुख्यमंत्र्यांचे शहर; मग अशा कारभाराला जबाबदार कोण?

नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असून राज्याचे मुख्यमंत्रीही नागपूरचे आहेत. अशा महत्त्वाच्या शहरातील वैधमापनशास्त्र विभागाच्या कार्यपद्धतीबाबत एवढ्या गंभीर तक्रारी समोर येणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. नागपूर विभागाचा प्रशासकीय कारभार पाहण्यासाठी सहनियंत्रक पदावर प्रभारी व्यवस्था असल्यास, त्या अधिकाऱ्यांचा मूळ कार्यभार दुसऱ्या विभागात असल्यामुळे स्थानिक विभागातील तक्रारी, निरीक्षणे आणि नियंत्रणावर परिणाम होत आहे का, याचीही तपासणी होणे आवश्यक आहे. सुमारे ५०० किलोमीटर अंतरावरून प्रभारी कारभार चालविला जात असल्यास नागपूर विभागातील प्रत्यक्ष प्रशासकीय नियंत्रण, तक्रारींचे निवारण आणि अधिकाऱ्यांवर देखरेख याबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

जनतेचे संरक्षण की केवळ महसूल वसुली?

वैधमापनशास्त्र विभाग हा व्यापारी, उत्पादक, परवानाधारक आणि सर्वसामान्य ग्राहक यांच्यामधील विश्वास टिकविणारा विभाग आहे. वजनात फसवणूक होऊ नये, ग्राहकाला योग्य वजन मिळावे आणि व्यापाऱ्यांना नियमांनुसार सेवा मिळावी, ही या विभागाची मूलभूत जबाबदारी आहे. परंतु जर शासकीय वर्किंग स्टँडर्ड वाहनांचा वापर होत नसेल, प्रमाणित वजनांच्या वापरावर प्रश्न उपस्थित होत असतील, तक्रारींची दखल घेतली जात नसेल आणि चौकशी अहवालानंतरही कारवाई होत नसेल, तर या विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणारच. मग हा विभाग जनतेच्या संरक्षणासाठी आहे की केवळ कागदोपत्री कामकाज आणि महसूल वसुलीसाठी, असा सर्वसामान्य नागरिकांना प्रश्न पडणे स्वाभाविक आहे.

शासनाकडे प्रमुख मागण्या

१. सन २०११ मध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून महाराष्ट्राला उपलब्ध करून देण्यात आलेल्या दोन्ही वर्किंग स्टँडर्ड वाहनांची संपूर्ण माहिती सार्वजनिक करण्यात यावी.

२. दोन्ही वाहनांची सध्याची स्थिती, मागील १५ वर्षांचे लॉगबुक, दुरुस्ती खर्च, वापराच्या नोंदी आणि वाहनांचे लोकेशन यांची तपासणी करावी.

३. नागपूर विभागातील मागील पाच वर्षांत करण्यात आलेल्या सर्व वेब्रिज पडताळणी व मुद्रांकनांची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करावी.

४. संबंधित निरीक्षकांनी कोणत्या कार्यकारी मानकांचा आणि कोणत्या प्रमाणित वजनांचा वापर केला, याची पडताळणी करावी.

५. कमर्शियल वेट्सचा वापर करून नियमबाह्य पडताळणी झाल्याचे आढळल्यास संबंधित अधिकारी आणि जबाबदार व्यक्तींवर नियमानुसार कारवाई करावी.

६. कामठी विभाग क्रमांक २ मधील निरीक्षकांविरोधात करण्यात आलेल्या तक्रारी, चौकशी अहवाल आणि त्यानंतर झालेल्या कार्यवाहीची माहिती सार्वजनिक करावी.

७. शासकीय वर्किंग स्टँडर्ड वाहने बंद असतील, तर ती दुरुस्त करून तातडीने कार्यान्वित करावीत किंवा पर्यायी प्रमाणित व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.

८. संपूर्ण प्रकरणाची राज्यस्तरीय स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी.

महत्त्वाचा प्रश्न

शासनाकडे वाहन काट्यांच्या पडताळणीसाठी स्वतंत्र वर्किंग स्टँडर्ड वाहने आहेत, प्रमाणित कार्यकारी मानके आहेत, कायदे आहेत, नियम आहेत आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकारीही आहेत. तरीही प्रत्यक्ष कामकाजात या सर्व व्यवस्थेचा योग्य वापर होत नसेल, तर या संपूर्ण यंत्रणेचा उपयोग तरी काय? नियम जनतेला दाखविण्यासाठी आणि स्वतःच्या सोयीने त्यांचे उल्लंघन करण्यासाठी आहेत का? रक्षकच भक्षक बनले असतील, तर सर्वसामान्य ग्राहकांचे संरक्षण कोण करणार? महाराष्ट्र शासन, केंद्र शासन आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रश्नांची उत्तरे द्यावीत. अन्यथा वैधमापनशास्त्र विभागाच्या कार्यपद्धतीवरील जनतेचा विश्वास अधिकाधिक कमी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

थोडक्यात

पाकमध्ये व्हॅन नदीत कोसळून १२ ठार

गिलगिट : पाकिस्तानच्या गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये एक भीषण दुर्घटना घडली. गिलगिटहून हुंदूर गावाकडे जाणारी एक व्हॅन नोह पुलाजवळ यासीन नदीत कोसळली. या अपघातात १२ जणांचा मृत्यू झाला असून २ प्रवासी जखमी झाले आहेत. बचाव पथकाने आतापर्यंत नदीतून १२ मृतदेह आणि २ जखमींना बाहेर काढले आहे. व्हॅनमध्ये आणखी काही प्रवासी असण्याची शक्यता वर्तवली जात असून त्यांचा शोध सुरू आहे. ही व्हॅन गिलगिटहून यासीन खोऱ्यातील हुंदूर गावाकडे जात होती. याच दरम्यान, गुरुवारी रात्री नोह पुलाजवळ चालकाचं नियंत्रण सुटून वाहन थेट नदीत कोसळलं. अपघाताची माहिती मिळताच बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. सुरुवातीला बचाव अधिकाऱ्यांनी पाच जणांचा मृत्यू आणि काही जण जखमी झाल्याची माहिती दिली होती. मात्र, नदीत शोधमोहीम राबवल्यानंतर आणखी मृतदेह हाती लागल्याने मृतांचा आकडा १२ वर पोहोचला आहे. तिन्ही जखमी प्रवाशांना उपचारासाठी गिजर जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या गाहकुच येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

समृद्धी महामार्गावर भरधाव ट्रकची १९ वाहनांना धडक, ३० जण जखमी



वृत्तसंस्था, सिंदखेडराजा

समृद्धी महामार्गावर तढेगाव नजीक शुक्रवारी सकाळी अकरा वाजता विचित्र अपघात घडला. या अपघातात जवळपास ३० जण जखमी असून बहुतांश जखमींना जालना येथील रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे, तर वर्धा येथील एका जखमी कुटुंबावर स्थानिक ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले.

समृद्धी महामार्गांच्या मुंबई कॉरिडॉरवरील चॅनल नंबर ३२२, तढेगाव नजीक सकाळी १.३० वाजता एक सिमेंटचा रिकामा ट्रक पलटी झाल्याने मुंबई लेन वरील वाहनं थांबवण्यात आली होती. पलटी ट्रक बाजूला करण्याचं काम सुरू असतानाच थांबलेल्या वाहनांना मागून येणाऱ्या अवजड कंटेनरने धडक दिली. कंटेनरचा ब्रेक लागेपर्यंत समोर उभ्या असलेल्या १८ कार व एक पोलीस वाहन अशी १९ वाहनं या धडकेत एकमेकांवर आढळली. ३० प्रवाशी जखमी झाले आहेत. त्यातील एका व्यक्तीची परिस्थिती गंभीर असल्याचं सांगण्यात आलं आहे. जखमींमध्ये महिला, मुलांचा समावेश आहे.

दरम्यान माहिती मिळताच समृद्धीवरील रुग्णवाहिका,एम एस एफ जवान, सिंदखेडराजा, किनगाव राजा येथील पोलीस, ग्रामीण रुग्णालयाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. ट्रॅफिक पोलिसांनी मार्ग मोकळा केला तर पोलिसांनी अपघातग्रस्तांना मदत केली.

काहींना महामार्गावर रुग्णवाहिकेत उपचार करून पुढील प्रवासासाठी सोडण्यात आलं. तर जवळपास १० ते १२ जणांना जालना येथे उपचारकामी पाठवण्यात आले. शहरातील ग्रामीण रुग्णालयात वर्धा येथील धाडे कुटुंबावर उपचार करण्यात आले.सध्या दिवाळी असल्याने समृद्धी महामार्ग गेल्या आठवड्यापासून व्यस्त आहे. दिवाळी पूर्वी मुंबई, पुणे, नाशिक येथून विदर्भात जाणाऱ्या वाहनांची नागपूर कॉरिडॉरवर वाहनांची मोठी गर्दी होती. तर आता आपल्या कार्यक्षेत्रात परतताना मुंबई कॉरिडॉरवर वाहनांची विशेषतः कारची मोठी वर्दळ आहे. मार्ग मोकळा होईल या प्रतिक्षेत अनेक वाहनं थांबली होती, मात्र काही क्षणात उभी वाहने एकमेकांवर आदळत गेली लोकांच्या ओरडण्याचा आवाज सुरू झाला.

काय होतं आहे हे कळलंच नाही, मात्र आमच्यासह अनेक वाहनं एकमेकांवर धडकली, आम्ही पुण्यात जाण्यास निघालो होतो. सर्वच वाहनं मुंबई, पुण्याकडे जात होती अशी माहिती या अपघातात जखमी झालेल्यांनी दिली.

ट्रॅव्हलर-कंटेनरच्या धडकेत २० जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था, काझीरंगा

आसामच्या काझीरंगामध्ये झालेल्या एका भीषण अपघातात २० जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रोंगाजान परिसरात प्रवासी असलेली एक ट्रॅव्हलर आणि कंटेनर ट्रक यांच्यात जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की ट्रॅव्हलरचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघातानंतर घटनास्थळी एकच आक्रोश सुरू झाला.

अपघातात इतरही अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात काझीरंगा येथील



रोंगाजान परिसरात झाला. प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या ट्रॅव्हलरची समोरून येणाऱ्या कंटेनर ट्रकशी जोरदार समोरासमोर धडक झाली. हा अपघात इतका भयानक होता की ट्रॅव्हलरचे तुकडे-तुकडे झाले. गाडीतील प्रवाशांना स्वतःला वाचवण्याचीही संधी मिळाली नाही. अपघातानंतर घटनास्थळी मोठी खळबळ उडाली. आजूबाजूच्या नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्याला सुरुवात केली. या धडकेनंतर ट्रॅव्हलर गाडीची झालेली अवस्था पाहून अपघाताच्या भीषणतेचा अंदाज येतो.

या भीषण अपघाताला आतापर्यंत २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच इतर अनेक जण गंभीर जखमी झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अपघातात जीव गमावलेल्या व्यक्तींची ओळख अद्याप पटलेली नसून याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. या दुर्घटनेनंतर संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. जखमींच्या प्रकृतीबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

मृतांचा आकडा वाढण्याची भीती

अपघाताची तीव्रता पाहता मृतांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही दुर्घटना नेमकी कशामुळे घडली आणि ट्रॅव्हलर व कंटेनर ट्रकची धडक कशी झाली, याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिस याचा अधिक तपास करत आहेत.

सरकारी कर्मचाऱ्यांना ईव्ही खरेदी अनिवार्य

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

आठव्या वेतन आयोगाच्या चर्चेदरम्यान केंद्र सरकारने सरकारी वाहन खरेदीबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयाने सर्व केंद्रीय मंत्रालये आणि विभागांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांच्या वापरासाठी वाहने खरेदी करण्यासंदर्भात नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. यानुसार, आता सरकारी विभागांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांना (ईव्ही) प्राधान्य दिले जाणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इलेक्ट्रिक वाहनांसाठी वाहनाच्या निव्वळ डीलर किमतीची मर्यादा वाढवून २० लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. तर पेट्रोल, डिझेल आणि हायब्रीड वाहनांसाठी ही मर्यादा १० लाख रुपये असेल. सरकारच्या या निर्णयामुळे सरकारी कार्यालयांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढण्यास मदत होणार आहे. तसेच प्रदूषण कमी करणे आणि पारंपारीक इंधनावरील देशाचे अवलंबित्व घटवणे, हा यामागील प्रमुख उद्देश आहे. पेट्रोल-डिझेल वाहन खरेदीसाठी कारण द्यावे लागणार असून एखाद्या मंत्रालयाला किंवा सरकारी विभागाला विशिष्ट कारणामुळे इलेक्ट्रिक वाहन वापरणे शक्य नसेल आणि पेट्रोल किंवा डिझेल वाहन खरेदी करणे आवश्यक वाटत असेल, तर त्यासाठी विशेष प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

संबंधित विभागाला पेट्रोल किंवा डिझेल वाहन खरेदी करण्यामागील ठोस कारणे स्पष्ट करून व्यय विभागाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल. या प्रस्तावाचा प्रत्येक प्रकरणानुसार स्वतंत्रपणे विचार केला जाईल. मात्र, असा प्रस्ताव पाठवण्यापूर्वी संबंधित मंत्रालय किंवा विभागाच्या सचिवांची मंजुरी आणि वित्तीय सल्लागारांची सहमती आवश्यक असेल. त्यानंतरच पुढील प्रक्रिया करता येईल.

संपादकीय लेखणीतून...

वन्यप्राण्यांनी जगावे की मरावे!

राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली अंदाधुंद वृक्षांची कत्तल होत आहे.याचे जिवंत उदाहरण रायगड जिल्ह्यातील कर्जतमधील टोरंट प्रकल्प सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. एकीकडे वृक्ष कटाईमुळे ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी कमी होत असुन सर्वांचा जीव गुदमरत आहे;तर दुसरीकडे प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे यामुळे मानव व पशुपक्षांचे जगणे कठीण झाले असून सर्वांच्याच आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.सध्याच्या परिस्थितीत देशासह राज्यात विकासाच्या नावाखाली वृक्षांची बेसुमार कटाईचा सपाटा जोरदार सुरू आहे त्यामुळे असे वाटत आहे की,देशात हे चाल्लय तरी काय! झाडांची अशीच कत्तल होत रहाली तर असे समजायला हरकत नाही की, माणसातील माणुसकी हरपली व मानुस माणुसकीन न रहाता जनावरापेक्षा निपत्तर झाला आणि माणुसकी संपुष्टात आली असे म्हणायला हरकत नाही. आज सर्वांच्याच आरोग्याच्या दृष्टीने ज्याची नितांत गरज आहे अशा वृक्ष देवतेची व पृथ्वी मातेची सरकार व वनविभाग सरेआम अवहेलना करीत असून कत्तल करीत आहे. यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतुंची स्वास घ्यायचा कसा असा गंभीर आणि जटील प्रश्न देशापुढे व देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे उपस्थित होत आहे. आज आपल्यालाच नाही तर सर्वांनाच निसर्गामुळे म्हणजेच वृक्षांमुळे नैसर्गिक ऑक्सिजन मिळत आहे व सर्वत्र सुखशांती दिसून येते.परंतु देशासह राज्यात अनेक प्रकल्प उभारून प्रदूषणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने संपूर्ण पृथ्वीतलावरील जीवजंतूचा जीव धोकादायक स्थितीत येऊन ठेपला आहे.

सरकारने गेल्या काही वर्षांत निसर्गाचे संपूर्ण वाटोळे केले असून त्याचा परिणाम म्हणून, वनवे लागने, भुस्खलन,अती उष्णता, पिण्याच्या पाण्याची पातळी कमी होणे इत्यादी अनेक समस्यांनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून यांचे गंभीर परिणाम अलनिनोच्या माध्यमातून राज्यासह देशात दिसत आहे. सरकारने अनेक प्रकल्पांचा सपाटा लावला असला तरी अनेक प्रकल्पांच्या तुलनेत वृक्षलागवड नगन्य असल्याचे दिसून येते. कारण प्रश्न असा उद्भवतो की, जमीनीवर अवाढव्य प्रकल्प उभारल्यानंतर सरकार झाडे लावणार कुठे? सरकार प्रकल्प उभारल्यानंतर झाडे लावण्याचे जे दावे करतात ते संपूर्ण दावे खोटे व फोल असल्याचे मी समजतो आणि हेच काम सरकार कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवर प्रकल्पाच्या बाबतीत करीत आहे.सरकार म्हणते की, टोरंट प्रकल्पाला लागणारी २५३ हेक्टर जमीनीच्या बदलत्या, दुसऱ्या २५३ हेक्टर पर्यायी जमिनीवर ९० हजार झाडे लावणार असल्याचे सरकार सांगत आहेत.मला हे समजत नाही की,जमीन काय झाडांना लागते का? अचानक २५३ हेक्टर जमीन सरकार उपलब्ध करून देणार कोठून आणि आता लावलेली झाडे मोठी व्हावला कमीत कमी दहा वर्षे लागतील याचा विचार सरकार का करीत नाही? सरकारच्या या प्रकल्पावरून सिध्द होते की, सरकार जी झाडे लावण्याची गोष्ट करीत आहे ती फक्त कागदावरच राहिल कृतीत होने कदापि शक्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे.जो रायगड जिल्हा जगप्रसिद्ध आहे व ज्या भुमित शिवाजी महाराजांचा इतिहास दडलेला आहे अशा हिरवागार गालिचा सरकार विकासाच्या नावाखाली नेस्तनाबूत करीत असेल तर ही बाब कोन्हिही सहन करणार नाही.सरकारने जर जबरदस्तीने वृक्षतोड केली तर,संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठल्या शिवाय रहाणार नाही ही बाब सरकारने व वनविभागाने लक्षात ठेवली पाहिजे.

देशातील काही राज्यांत ओला दुष्काळ तर काही राज्यांत कोरडा दुष्काळ दिसून येत आहे.एवढे सर्व गंभीर परिणाम पृथ्वीवर सरकारला दिसत असून सुद्धा नवीन प्रकल्पाच्या उभारणीसाठी लाखों वृक्षांची कत्तल सरकार करण्याच्या तयारीत सरकार आहे ही अत्यंत शरमेची आणि लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील टोरंट कंपनीचा पंप स्टोरेज ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी सरकारची मोठ्या प्रमाणात खटाटोप सुरू आहे. परंतु या प्रकल्पामुळे राज्याला व राज्यातील जनतेला किती मोठे नुकसान होणार आहे याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. सह्याद्रीच्या कुशीत खुप काही दडलेले आहे त्यावर सरकारने जर वक्र नजर टाकली तर राज्य विनाशाच्या उंबरठ्यावर येऊ शकते यालाही नाकारता येत नाही. सह्याद्रीच्या जंगलात सुरू असलेल्या वृक्षतोडीचा संबंध प्रामुख्याने रायगड जिल्ह्यातील कर्जत जवळील सायडोंगर परिसरात एका मोठ्या ऊर्जा प्रकल्पाशी आहे. 'टोरंट पॉवर' या कंपनीच्या ३,००० मेगावॅट क्षमतेच्या 'पंप स्टोरेज हायड्रो प्रोजेक्ट'साठी मोठ्या प्रमाणावर झाडे काप्ण्यास वन विभागाने परवानगी दिली आहे, वनविभाग झाडे लावण्याचे काम करतात की तोडण्याचे काम करतात ही बाब आमजनतेच्या समजण्यापलीकडची आहे.त्यामुळे आता राज्यासह देशात वनविभाग रहाला नसून वनकत्तल विभाग झाला की काय असे चित्र दिसत आहे.त्यामुळे याकरिता जनतेचा मोठा आक्रोश सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सायडोंगर क्षेत्र, जे भीमाशंकर वन्यजीव अभयारण्याच्या बफर झोनच्या किंवा जंगलाच्या जवळ आहे. या प्रकल्पासाठी जवळपास २५३ हेक्टर वन जमीन वळवण्यात येत आहे.

सरकारी आणि वन विभागाच्या कागदपत्रांनुसार ३२,४९० झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे.परंतु हा आकडा ५० हजारांच्या वर असू शकतो यालाही नाकारता येत नाही.आज ५० वर्षे जुनी ३२४९० झाडांपासून मिळणारी शुद्ध हवा आणि ऑक्सिजन वृक्ष कटाईनंतर मिळणार कोठून आणि त्या झाडाच्या सान्निध्यात राहणाऱ्या पशुपक्ष्यांचे काय होणार याचा विचार सरकारने केला का? सरकार प्रकल्प उभारणीच्या पुर्ण तयारीत आहे. त्या अनुषंगाने सरकार वनविभाला २५३ हेक्टर पर्यायी जमीन देणार असल्याचे सांगितले जाते व त्यावर ९० हजार झाडे लावणार असल्याचे म्हटले जाते. यावर मी सरकारला प्रश्न विचारतो की,२५३ हेक्टर जमीन आणणार कोठून; २५३ हेक्टर जमीनीची भरपाई करण्यासाठी सरकार राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेल्या शेकडो हेक्टर जमीनीतुन देणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. आज राजकीय पुढाऱ्यांजवळ वाममार्गाने कमविलेली शेकडो हेक्टर जमीन आहे त्यावर सरकार वृक्ष लागवड का करीत नाही? सरकार म्हणते की,स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून त्यातून मार्ग काढला जाईल, सरकार प्रकल्पासाठी हजारो झाडे काप्ण्याच्या तयारीत आहे आणि ग्रामस्थांशी चर्चा करण्याची भाषा करतात हा सर्व सरकारचा लपंडाव सुरू असल्याचे दिसून येते.

एका छोट्याशा ज्योतीने विझवले सहा जीवनदीप

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

दिवाळी हा दिव्यांचा, प्रकाशाचा आणि आनंदाचा सण मानला जातो. सर्वत्र रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी आणि फराळाचा गोडवा यामुळे प्रत्येक घर चैतन्याने उजळून निघालेले असते. मात्र, याच प्रकाशाच्या सणात एका कुटुंबावर असा काही काळाचा आघात झाला की, संपूर्ण गावच नव्हे तर अख्खा महाराष्ट्र हळहळला आहे. सणासुदीच्या या आनंददायी वातावरणात घरासमोर लावलेली एक छोटीशी पणती एका हसत्याखेळत्या कुटुंबासाठी थेट मृत्यूचे कारण ठरेल, याची कोणी साधी कल्पनाही केली नसेल. धाराशिव जिल्ह्यातील एका गावात घडलेल्या अत्यंत हृदयद्रावक आणि अंगावर काटा आणणाऱ्या भीषण दुर्घटनेत एकाच कुटुंबातील तब्बल सहा सदस्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. या घटनेमुळे उत्सवाच्या आनंदावर दुःखाचे मोठे सावट पसरले असून, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हा प्रसंग एक अत्यंत धडा शिकवणारा आणि अभ्यासपूर्ण विचार करायला लावणारा ठरला आहे.

धाराशिव तालुक्यातील येडशी या गावामध्ये करंडे कुटुंब वास्तव्याला होते. या कुटुंबाचा उदरनिर्वाह त्यांच्या स्वतःच्या व्यवसायावर चालत असे. कुटुंबाच्या राहत्या इमारतीची रचना अशी होती की, खालच्या म्हणजेच तळमजल्यावर त्यांचे किराणा मालाचे मोठे दुकान होते आणि वरच्या मजल्यावर संपूर्ण करंडे कुटुंब एकत्र राहत होते. घरातील कर्ते पुरुष गोविंद करंडे हे आपल्या वृद्ध आई-वडिलांचा, पत्नीचा आणि मुलांचा सांभाळ करत होते. तीन पिढ्या एकत्र राहणारे हे एक सुखी आणि समाधानी कुटुंब होते. दिवाळीचे दिवस असल्याने साहजिकच घरामध्ये उत्साहाचे वातावरण होते. दुकानातही सणासुदीनिमित्त मोठ्या प्रमाणावर किराणा माल आणि इतर साहित्याची साठवणूक करण्यात आली होती. मात्र, व्यावसायिक साठवणूक आणि घराची ही दुमजली रचना आपत्कालीन स्थितीत त्यांच्यासाठी जीवघेणी ठरेल, याचा अंदाज त्यांना आला नाही. या संपूर्ण हाहाकाराची सुरुवात एका अत्यंत साध्या आणि नेहमीच्या कृतीतून झाली. ९ नोव्हेंबर २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास हा सर्व थरार घडला. दिवाळीनिमित्त घराच्या दारासमोर सर्वांप्रमाणेच या कुटुंबानेही पणती लावली होती. रात्री अंदाजे २ वाजून ३० मिनिटांच्या आसपास या पणतीमुळे अचानक आग लागली. सुरुवातीला अत्यंत क्षुल्लक वाटणाऱ्या या आगीने पाहता पाहता रौद्ररूप धारण केले. तळमजल्यावर असलेल्या किराणा दुकानात प्लॅस्टिकचे साहित्य, खाद्यतेल आणि इतर ज्वलनशील वस्तूंचा मोठा साठा होता. या साहित्यामुळे आगीला मोठे खाद्य मिळाले आणि काही क्षणांतच संपूर्ण दुकानाने पेट घेतला. आगीच्या या वेगाने पसरणाऱ्या स्वरूपामुळे कोणालाही काहीही विचार करण्याची किंवा सावरण्याची संधीच मिळाली नाही.

आगीच्या या भीषण तांडवामुळे दुकानातून प्रचंड मोठ्या प्रमाणावर धुराचे लोट उठू लागले. आगीच्या ज्वाला आणि धुराने संपूर्ण घराला वेढले. या गोंधळात आणि गोंधळात घरातील सदस्य जीव वाचवण्यासाठी धावपळ करू लागले. मात्र, धुराचे प्रमाण इतके जास्त होते की, श्वास घेणेही कठीण झाले. या गोंधळात आणि धुरामुळे घराबाहेर पडण्याचा मार्ग सापडणे अत्यंत कठीण झाले. अनेकांना श्वास कोंडल्याने आणि आगीच्या ज्वालांमध्ये होरपळून निघाल्याने अत्यंत तडफडून या कुटुंबातील सदस्यांचा मृत्यू झाला. यामध्ये गोविंद करंडे, त्यांची पत्नी, त्यांचे वृद्ध आई-वडील आणि दोन लहान निरागस मुली अशा एकूण ६ जणांचा जागीच दुर्दैवी अंत झाला. एकाच घरातील तीन पिढ्या या आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने या घटनेची भीषणता अधिकच गडद झाली आहे.

या भयानक अग्नितांडवाची माहिती मिळताच परिसरातील नागरिक आणि अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वांनी अथक प्रयत्न केले. या बचावकार्यादरम्यान सुदैवाने कुटुंबातील एकच व्यक्ती थोडक्यात बचावली असून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आहे. सध्या त्यांच्यावर नजीकच्या रुग्णालयात वैद्यकीय उपचार सुरू आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली. सर्व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले. फॉरेन्सिक टीम आणि पोलीस या आगीच्या नेमक्या कारणांचा अत्यंत बारकाईने तपास करत आहेत. या दुर्घटनेमुळे संपूर्ण येडशी गावावर मोठी शोककळा पसरली असून, एका छोट्याशा चुकीमुळे किंवा दुर्लक्षामुळे एका संपूर्ण कुटुंबाची राखरांगोळी कशी होऊ शकते, याचे हे अत्यंत विदारक उदाहरण ठरले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील येडशी येथे घडलेली ही हृदयद्रावक दुर्घटना केवळ एका कुटुंबावर कोसळलेले संकट नाही, तर प्रत्येक समाजासाठी आणि प्रशासनासाठी गंभीर इशारा आहे. दिवाळीसारख्या प्रकाशाच्या आणि आनंदाच्या सणात एका छोट्याशा पणतीमुळे लागलेल्या आगीने एका घरातील सहा जीव हिरावून घेतले आणि तीन पिढ्यांचा संसार एका क्षणात उद्ध्वस्त झाला. ही घटना आपल्याला सांगून जाते की, आग लागण्याची घटना कितीही लहान कारणाने सुरू झाली तरी ज्वलनशील वस्तूंचा साठा, घराची असुरक्षित रचना आणि आपत्कालीन बाहेर पडण्याच्या मार्गाचा अभाव यामुळे ती क्षणार्धात महाभयंकर रूप धारण करू शकते.

या दुर्घटनेतून घर, दुकाने आणि व्यावसायिक इमारतींमध्ये अग्निसुरक्षेचे नियम काटेकोरपणे पाळण्याची गरज प्रकर्षाने अधोरेखित झाली आहे. विशेषतः जिथे तळमजल्यावर ज्वलनशील वस्तूंचा साठा आणि वरच्या मजल्यावर कुटुंबाचे वास्तव्य असते, अशा ठिकाणी स्वतंत्र सुरक्षित बाहेर पडण्याचा मार्ग, अग्निशामक यंत्रणा, धूर-सूचक यंत्रे आणि नियमित सुरक्षा तपासणी अत्यावश्यक आहे. सण-उत्सव साजरे करताना आनंदासोबत सावधगिरी आणि सुरक्षेची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे.

सहा निष्पाप जीवांचा हा दुर्दैवी अंत आपल्याला एकच वेदनादायी संदेश देऊन जातो– प्रकाशाचा सण साजरा करताना सुरक्षेचा प्रकाशही प्रत्येक घरात तेवत राहिला पाहिजे. एका क्षणाच्या दुर्लक्षाची किंमत अनेकदा आयुष्यभराच्या दुःखात मोजावी लागते. त्यामुळे या दुर्घटनेतील मृतांना खरी श्रद्धांजली हीच ठरेल की, समाजाने या घटनेतून धडा घेऊन प्रत्येक घर, दुकान आणि परिसर अधिक सुरक्षित करण्यासाठी सजगपणे पावले उचलावीत.

- ९५६१५१४३०६

आशिया कपचा महासंग्राम! भारत-पाकिस्तान अंतिम लढतीला वय फसवणुकीच्या वादाची किनार!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

अफगाणिस्तानला लोळवून भारत अंतिम फेरीत; पाकिस्तानशी १४ नोव्हेंबरला जेतेपदासाठी महामुकाबला; युवा क्रिकेटच्या निष्पक्षतेवरही प्रश्नचिन्ह !

१९ वर्षाखालील आशिया कप क्रिकेट स्पर्धेचा थरार आता निर्णायक वळणावर पोहोचला आहे. उपांत्य फेरीतील दोन्ही सामने पार पडले असून, अंतिम सामन्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. १४ नोव्हेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी आशिया कपच्या जेतेपदासाठी आमनेसामने येणार आहेत. भारताने अफगाणिस्तानचा आठ गडी राखून धुव्वा उडवत अंतिम फेरी गाठली, तर पाकिस्तानने बांगलादेशला नऊ गडी राखून पराभूत केले. मात्र, या स्पर्धेत भारत-पाकिस्तान सामन्याला केवळ क्रिकेटमधील संघर्षाचीच नव्हे, तर पाकिस्तानच्या खेळाडूंच्या वयाबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांचीही पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामुळे अंतिम सामन्याची उत्सुकता अधिकच वाढली आहे.

लक्ष्य-आर्यवीरची तुफानी फलंदाजी; अफगाणिस्तानचे आव्हान धुळीस!

पहिल्या उपांत्य सामन्यात अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकांत आठ गडी गमावून २२७ धावा उभारल्या. भारतासमोर २२८ धावांचे लक्ष्य होते. मात्र, भारतीय युवा फलंदाजांनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा स्वीकारत अफगाणिस्तानच्या गोलंदाजीचा समाचार घेतला. सलामीवीर आर्यवीर सेहवाग आणि कर्णधार लक्ष्य राजेश रायचंदानी यांनी पहिल्या गड्यासाठी ११७ धावांची शानदार भागीदारी केली. मागील सामन्यात शतक झळकावणाऱ्या आर्यवीरने आपली आक्रमक लय कायम ठेवत ५७ चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांसह ५१ धावा केल्या. त्यानंतर कर्णधार लक्ष्यने जबाबदारी स्वीकारत ९० चेंडूत १३ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ९३ धावांची अप्रतिम खेळी केली. त्याचे शतक अवघ्या सात धावांनी हुकले.

लक्ष्यने व्ही. के. विनीतच्या साथीने दुसऱ्या गड्यासाठी ७७ धावांची भर घातली. विनीतने नाबाद ५७, तर यशवर्धन चौहानने नाबाद १६ धावा करत भारताचा विजय निश्चित केला. भारताने अवघ्या ३६.५ षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात २३० धावा करत

रामटेकच्या ऐतिहासिक कार्तिक पौर्णिमा महोत्सवासाठी ५० लाखांचा विशेष निधी मंजूर करा!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक रजत गजभिये यांची निवेदनाद्वारे मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

विदर्भाची धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख असलेल्या तीर्थक्षेत्र रामटेक येथील पारंपरिक कार्तिक पौर्णिमा महोत्सवाला भव्य स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ५० लाख रुपयांचा विशेष आर्थिक निधी मंजूर करावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी भारतीय जनता पार्टी रामटेक यांनी राज्याचे मुख्यमंत्री तथा महाराष्ट्राचे लोकप्रिय नेतृत्व मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

रामटेक हे प्राचीन धार्मिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेले प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून, येथील श्रीराम मंदिर (भोसला देवस्थान) येथे दरवर्षी कार्तिक महिन्यात पारंपरिक कार्तिक पौर्णिमा महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा केला जातो. या महोत्सवाला अनेक वर्षांची परंपरा असून, रामटेकसह विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून तसेच मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यातूनही हजारो भाविक या धार्मिक सोहळ्यात सहभागी होण्यासाठी येत असतात.

कार्तिक मासानिमित्त शरद पौर्णिमेपासून दररोज पहाटे ५ वाजता श्रीराम मंदिर (भोसला देवस्थान) येथे काकड आरतीचे आयोजन केले जाते. पहाटेच्या मंगलमय वातावरणात होणाऱ्या या काकड आरतीला हजारो भाविक उपस्थित राहून श्रीरामाचे दर्शन घेतात. या धार्मिक परंपरेमुळे रामटेकच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर पडते. या काकड आरतीपासून सुरू झालेल्या धार्मिक उत्सवाची सांगता कार्तिक पौर्णिमेला होते.

या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी आयोजित करण्यात येणारी भव्य शोभायात्रा, कार्तिक पौर्णिमेनिमित्त काढण्यात येणारी श्रीराम रथयात्रा व त्रिपुर महोत्सव आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी आयोजित केला जाणारा भव्य मंडई उत्सव होते. या सर्व कार्यक्रमांमध्ये भाविक, नागरिक, विविध धार्मिक संस्था, सामाजिक संघटना आणि स्थानिक नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. संपूर्ण रामटेक शहर भक्तिमय वातावरणाने भारावून जाते.

या महोत्सवामुळे रामटेकच्या धार्मिक परंपरेचे जतन होण्यासोबतच शहरातील सामाजिक एकोपा, सांस्कृतिक वारसा आणि पर्यटनालाही चालना मिळते. महोत्सवाच्या निमित्ताने बाहेरगावाहून मोठ्या संख्येने भाविक रामटेक येथे येत असल्यामुळे स्थानिक व्यापारी, छोटे व्यावसायिक, दुकानदार आणि विविध व्यवसायांना आर्थिक लाभ मिळतो. त्यामुळे हा महोत्सव केवळ धार्मिक उत्सव न राहता रामटेकच्या सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठीही महत्त्वपूर्ण ठरत आहे.

मात्र, या भव्य आणि ऐतिहासिक महोत्सवाच्या आयोजनासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक खर्च येतो. शोभायात्रा, रथयात्रा, धार्मिक कार्यक्रम, विद्युत रोषणाई, ध्वनी व्यवस्था, सजावट, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि इतर नियोजनासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असते. सध्या हा सर्व खर्च प्रामुख्याने नागरिक व भाविकांच्या लोकवर्गणीतून उभारला जातो. त्यामुळे या पारंपरिक महोत्सवाला शासनाकडून आर्थिक सहकार्य मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, रामटेक येथे २२ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या रामटेक सांस्कृतिक महोत्सवासाठी महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्याच धर्तीवर रामटेकच्या शेकडो वर्षांच्या धार्मिक परंपरेशी जोडलेल्या कार्तिक पौर्णिमा महोत्सवासाठीही शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी रजत गजभिये यांनी निवेदनातून केली आहे. या निधीमुळे कार्तिक पौर्णिमा महोत्सवाचे आयोजन अधिक नियोजनबद्ध, भव्य आणि आकर्षक पद्धतीने करता येईल. तसेच भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, महोत्सवाचे योग्य व्यवस्थापन करणे आणि रामटेकच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला व्यापक प्रसिद्धी देणे शक्य होईल. रामटेकच्या ऐतिहासिक धार्मिक महोत्सवाला शासनाच्या माध्यमातून अधिकृत आर्थिक पाठबळ मिळाल्यास भविष्यात या महोत्सवाला राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करून देण्यास मोठी मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

रामटेकच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाचे जतन करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे राज्य शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागाला तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत आणि कार्तिक पौर्णिमा महोत्सवासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी विनंती भाजपा रामटेक द्वारे करण्यात आली त्यावेळी रजत गजभिये अध्यक्ष भाजपा रामटेक तथा नगरसेवक, संजय मुलमुले उपाध्यक्ष भाजपा, आलोक मानकर उपाध्यक्ष रामटेक, उमेश पटले महामंत्री भाजपा नगरसेवक कविता मुलमुले, लक्ष्मी अहिरकर, इतर सर्व भाजपा प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

थोडक्यात

वाडीत अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग

वाडी पोलिसांनी आरोपीला ठोकल्या बेड्या

दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

वाडी पोलीस ठाणे हद्दीतील दवलामेटी, गणेशनगर येथे एका अल्पवयीन मुलींवर सोबत राहणाऱ्या तरुणाने अतिप्रसंग केल्याची घटना उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली आहे. वाडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी ही मागील एक महिन्यापासून पती, मुलगी व मुलगा यांचे सह राहून मजुरीचे काम करते. गोडाऊन मोठे असल्याने इतरही मजूर या ठिकाणी वास्तव्य करीत आहेत. दरम्यान काही मजूर दिवाळीनिमित्त गावालाही गेलेले आहेत.

घटनेच्या दिवशी गुरुवारी (ता.११) ला हे मजदुरीचे काम करणारे दांपत्य कामावर गेले असता त्यांची मुलगी प्रीती (बदललेले नाव) वय - १० वर्ष ही आपले लहान भावासह घरी खेळत होती, दरम्यान आरोपी रामेश्वर बळीराम उईके वय - २५ वर्ष हा गावावरून परत आला असता त्याने पीडित मुलीच्या लहान भावाला बाहेर जाण्यास सांगितले व मुलीवर जबरदस्तीने अतिप्रसंग केला. व याची माहिती कुणालाही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. कसेबसे मुलीने आरडा-ओरड करून स्वतःची सुटका करून घेतली व शेजारच्या घरी जाऊन बसली. सायंकाळी आई-वडील कामावरून येताच आईने लहान मुलाला मुलीबद्दल विचारणा केली असता ती शेजारच्या घरी असल्याचे सांगितले. आईने मुलीला बोलवून घेताच ती घाबरलेल्या अवस्थेत एकदम रडायला लागली. आईने अधिक विचारपूस करता तीने घडलेली आपबीती सांगितली. यावर आईने तीचे ठेकेदार सचिन राऊत यांना मुली सोबत झालेल्या घटनेची माहिती दिली. त्यांनी तातडीने वाडी पोलीस स्टेशन गाठून रीतसर घटनेची माहिती वाडी पोलिसांना दिली. वाडी पोलिसांनी घटनास्थळ गाठून आरोपीला ताब्यात घेतले. मुलीची वैद्यकीय तपासणी करून आरोपीवर पोक्सो अंतर्गत विविध कलमान्वये गुन्ह्याची नोंद करून आरोपीला न्यायालयात हजर केले. पुढील तपास वाडी पोलीस करीत आहे.

मेंढेपठार (बाजार) काटोल येथे हजरत गौशाहवली बाबा यांच्या उर्सनिमित्त कव्वाली मुकाबला व रक्तदान शिबिर संपन्न!



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

हजरत गौशाहवली बाबा सेवा समिती, मेंढेपठार (बाजार), ता. काटोल यांच्या वतीने सालाना उर्स शरीफनिमित्त आयोजित भव्य कव्वाली मुकाबला बुधवार, दिनांक ११ नोव्हेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. तसेच लाईफ लाईन ब्लड सेंटर द्वारा "रक्तदान शिबीर " आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून काटोल-नरखेड विधानसभा क्षेत्राचे आमदार मा. श्री. चरणसिंगजी ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमात नागपूर येथील प्रसिद्ध कव्वाल दिनेश गोलाईत आणि नियाज कादरी यांच्यात रंगलेला कव्वाली मुकाबला हे विशेष आकर्षण ठरले. दोन्ही कव्वालींनी आपल्या सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कव्वालीच्या माध्यमातून सामाजिक एकता, बंधुभाव आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देण्यात आला. तसेच इच्छुक रक्तदात्यांनी रक्तदान करुन सामाजिक कार्यात सहभाग नोंदविला.

यावेळी समितीचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर चिखले यांनी आमदार महोदयांचे स्वागत केले, व दरगाह परिसरात विविध विकास कामाची मागणी केली, ज्यामध्ये भक्तांकरीता पिण्याचे पाण्यासाठी तलावाजवळ विहीर करुन पाणी पुरवठा करणे, सभामंडप, पेवींग ब्लाक लावणे. या सर्व कामाला आ.चरणसींगजी ठाकुर यांनी मंजुरी दिली व लवकरच कामे पुर्ण करण्याचे आश्वासन दिले.याप्रसंगी उपस्थित राजुभाऊ हरणे, मारोतराव बोरकर, विनायकराव मानकर, अशोकराव काळे, भोजराज बागडे, बंडुभाऊ राठोड, अबदुल शेख वसंतराव चरपे, नासीरभैया (अलीबाग), निशांत आरोडे, दिगांबर मुसळे, असीम शेख, सुशील पंजवानी, निलेश कोल्हे, गफुर शेख, जय पराडकर, पप्पुभैया यादव, मुन्ना सेंगर, नरेंद्र कोहळे, रामेश्वर चरपे, विनोद चौधरी, कोठीराम थेटमाले, शाबु पठाण, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर चिखले, मुस्तफा शेख, इशाक बराडेद, प्रमोदकुमार मिराणी, रफीक शेख, देशराज पवार, प्रवीण थोटे, अजय बंबल, राजू शेख, सुधाकर कापसे, सागर राऊत, गौरव भिंगारे, उमेश कातलाम, आरीफ शेख, शैलेश धर्मे, सतीश कापसे, मनोहर हेलोंडे, मंगेश ताजने, चंदु हेलोंडे, सुभाष मोहीते, किसन मडावी मोहन कापसे, आशीष कोहळे, अशोक ऐकोणपुरे, चरण पाटील, यांच्यासह सर्व आयोजकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला मेंढेपठार (बाजार) येथील कार्यकर्ते, नागरिक तसेच परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

वाडी वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या अध्यक्षपदी अमित रामटेके यांची बाजी!

४३ सदस्यांचे मतदान; दिवाळी मिलन सोहळ्यात फराळ, मिठाई व भेटवस्तूंचे वितरण

दै. सिंहवाणी वृत्त, वाडी : वाडी, डिफेन्स, दवलामेटी व लावा परिसरातील नागरिकांना दररोज सकाळी वृत्तपत्रे उपलब्ध करून देणाऱ्या वाडी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचा दिवाळी मिलन सोहळा, वार्षिक सभा व अध्यक्ष निवड प्रक्रिया उत्साहात पार पडली. यात अमित रामटेके यांनी सर्वाधिक मते मिळवत अध्यक्षपदावर विजय मिळविला. रविवार, ९ नोव्हेंबर रोजी वाडी पत्रकार संघाच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात संघटनेच्या वार्षिक कामकाजाचा लेखाजोखा मांडण्यात आला. अध्यक्षपदासाठी अमित रामटेके, नितीन सव्वाशेरे व पंकज पानतावणे हे तीन उमेदवार रिंगणात होते. एकूण ४८ मतदारांपैकी ४३ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून गजानन तलमले, विजय वानखेडे, प्रवीण सिंग, आंचल लोखंडे, विकास बन्सोड व विलास माडेकर यांनी काम पाहिले. मतमोजणीनंतर अमित रामटेके यांची अध्यक्षपदी, नितीन सव्वाशेरे यांची कार्याध्यक्षपदी, पंकज पानतावणे यांची उपाध्यक्षपदी, तर ज्ञानीवंत कोकाटे यांची सहकोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली.



कार्यक्रमाला वाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन मगर, प्राचार्य सुभाष खाकसे, पत्रकार संघाचे अध्यक्ष गजानन तलमले, सचिव विजय वानखेडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांना दिवाळीनिमित्त मिठाई, फराळ व घड्याळ भेट देण्यात आले. पत्रकार व पोलीस अधिकाऱ्यांनाही मिठाईचे वितरण करण्यात आले. पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेते हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, सामाजिक जागृती व सुरक्षिततेसाठी दोन्ही घटकांचे परस्पर सहकार्य महत्त्वाचे असल्याचे मान्यवरांनी सांगितले. सूत्रसंचालन नागेश बोरकर यांनी केले, तर आभार राजेश मुन यांनी मानले. कार्यक्रमाला संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व वृत्तपत्र विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मायेचा आधार... शिक्षणाचा अधिकार!

दोन विद्यार्थिनींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून मुख्याध्यापिका हर्षा मोडक यांचा माणुसकीचा आदर्श


दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

शिक्षक केवळ ज्ञानदानच करीत नाही, तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आधार देण्याचेही काम करतो, याचा प्रत्यय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोतेवाडा येथील प्रभारी मुख्याध्यापिका हर्षा अजय मोडक यांच्या कार्यातून येत आहे. मोडक यांनी गेल्या दोन वर्षांपासून शाळेतील अनाथ विद्यार्थिनी रोशनी अमोल हिवरकर आणि एकल माता कुटुंबातील विद्यार्थिनी मृणाली पितांबर बारापात्रे यांच्या संपूर्ण शैक्षणिक जबाबदारीचे पालकत्व स्वीकारले आहे. विशेष म्हणजे, कोणताही गाजावाजा किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता त्या दोन्ही मुलींना मदत करीत आहेत. वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल, चित्रकलेचे साहित्य यांसह आवश्यक शैक्षणिक साहित्याचा खर्च त्या स्वतः करतात. तसेच वेळोवेळी आर्थिक मदत करून त्यांच्या गरजाही पूर्ण करतात. विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच सर्वांगीण विकासासाठी त्या मार्गदर्शन करतात.



मोडक यांच्या सहकार्यामुळे मुलींची शैक्षणिक प्रगती होत असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. आर्थिक परिस्थितीमुळे कोणतेही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये, हा संदेश आपल्या कृतीतून देणाऱ्या हर्षा मोडक यांचे कार्य शिक्षकांसह समाजासाठीही प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या माणुसकीच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

गोराईमध्ये विश्वामित्र सोसायटीत साकारली सिंधुदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती



दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

दिवाळी सणाचे औचित्य साधत आपली ऐतिहासिक परंपरा, संस्कृती आणि गड-किल्ल्यांचा वारसा जपण्याचा अनोखा उपक्रम विश्वामित्र सहकारी गृह निर्माण सोसायटी, प्लॉट नं. १००, गोराई १, बोरिवली पश्चिम येथे राबविण्यात आला आहे. यंदा सोसायटीतील बालगोपालांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची साक्ष देणाऱ्या ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ल्याची आकर्षक प्रतिकृती साकारली आहे. विशेष म्हणजे, दिवाळीनिमित्त सलग १४ वर्षांपासून सोसायटीतील बालगोपालांकडून दरवर्षी वेगवेगळ्या ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारण्यात येतात. या उपक्रमातून मुलांना महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि गड-किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व समजण्यास मदत होत आहे.

यंदा उभारण्यात आलेली सिंधुदुर्ग किल्ल्याची प्रतिकृती संपूर्णतः पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून तयार करण्यात आली आहे. मुलांच्या कल्पकतेला, कलागुणांना आणि सामूहिक सहभागाला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. दिवाळीच्या आनंदासोबतच ऐतिहासिक वारशाची जपणूक, पर्यावरण संवर्धन आणि पुढील पिढीमध्ये महाराष्ट्राच्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण करण्याचा विश्वामित्र सोसायटीचा हा १४ वर्षांचा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहे.

कोदामेंढी येथे मंडई 'मेला' उत्सवाला आजपासून थाटात सुरुवात

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

मौदा तालुक्यातील व नागपूर जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कोदामेंढी येथील मंडई उत्सवाला उद्या शनिवार (ता.१४ नोव्हेंबर) पासून थाटात सुरुवात होणार आहे. मागील अनेक वर्षापासून या मंडई उत्सवाला तालुका व जिल्ह्यातील नागरिकांचा प्रतिसाद पाहता या मंडई उत्सवाचे नाव आता मंडई 'मेला' उत्सव झालेले आहे. दिवाळी संपली की तालुका व जिल्ह्यातील गावा - गावांमध्ये मंडई उत्सवाला सुरुवात होते. दिवाळी संपताच 'कब है कोदामेंढी का मंडई 'मेला' उत्सव ?'असे तालुक्यातील व जिल्ह्यातील नागरिक एकमेकांना विचारपूस करून कोदामेंढी गावातील मंडई 'मेला' उत्सवाचे आकर्षण वाढवत असतात.

या मंडई 'मेला' उत्सवानिमित्त उद्या शनिवार (ता.१४ नोव्हेंबर)ला सायं. १० वाजता आदर्श नाट्य मंडळातर्फे वार्ड क्रं. २ येथील आदर्श चौकात नागपूर येथील रोहन डान्स ग्रुप यांच्या रेकॉर्डिंग डान्स, तर राष्ट्रीय नाट्य मंडळातर्फे वार्ड क्र.४ येथील बाजार चौकात नागपूर येथील यादगार डान्स ग्रुप यांच्या कार्यक्रम होणार आहे.

रविवार (ता. १५ नोव्हेंबर)ला सकाळी १० वाजता पासून ते सायंकाळपर्यंत आदर्श नाट्य मंडळातर्फे शाहीर ज्ञानेश्वर, किशोर नक्कलकार, छोटू मास्तर,डान्सर धीरज आणि मोंटी तथा सर्व संचाने सुसज्जित नवयुवक कलंगी पार्टी दुधाळा शाखा जयताळा यांच्या तमाशा, तर राष्ट्रीय नाट्य मंडळातर्फे शाहीर अंबादास नागदेवे व शाहीर आर्यन यांच्या राष्ट्रीय खडा तमाशा तसेच वार्ड क्रमांक १ मधील बस स्थानक चौकात तर वार्ड क्रमांक ३ येथील ग्रामपंचायत चौकातही विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. गावातील चारही वार्डात विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याने संपूर्ण गावात दिवस-रात्र रेलचेल असते व संपूर्ण गावातील मुख्य रस्ते दोन्ही बाजूने विविध प्रकारच्या दुकानाने सजलेले असतात. त्यामुळे या मंडई उत्सवाला मंडई 'मेला' उत्सवाचे स्वरूप आलेले आहे.

याप्रसंगी गावातील, परिसरातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून या मंडई 'मेला' उत्सवाच्या यशस्वीतेसाठी आदर्श नाट्य मंडळ, राष्ट्रीय नाट्य मंडळ, बस स्थानक चौकातील मंडळ व ग्रामपंचायत चौकातील मंडळाचे सर्व पदाधिकारी परिश्रम घेत असून गावातील सर्व व्यापारीवर्ग व ग्रामस्थ सहकार्य करीत आहेत.

हरभरा बियाण्याचा तिढा अखेर कृषी विभागाच्या दारी!

२५१ शेतकरी अजूनही प्रतीक्षेत, तालुका कृषी अधिकाऱ्यांचे महाबीजला तातडीने बियाणे पुरविण्याचे पत्र

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

अनुदानित हरभरा बियाण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या भिवापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडचणींची अखेर कृषी विभागाने दखल घेतली आहे. २५१ पात्र (तालुका खरेदी विक्री संस्थेनुसार हा आकडा २५७ असा आहे) शेतकरी अद्याप बियाण्यापासून वंचित असल्याची अधिकृत कबुली देत तालुका कृषी अधिकारी सुप्रिया कोकणी यांनी महाबीज प्रशासनाला तातडीने बियाणे उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. त्यामुळे अनुदानित बियाणे वाटपातील गोंधळ आता अधिकृत पत्रव्यवहारातूनही समोर आला आहे.

कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत रब्बी हंगाम २०२६-२७ साठी भिवापूर तालुक्यातील ५२६ शेतकऱ्यांची प्रमाणित हरभरा बियाण्याच्या वितरणासाठी निवड करण्यात आली. यामध्ये पाच वर्षांपर्यंतच्या वाणासाठी ३९४, तर पाच ते दहा वर्षांतील वाणासाठी १३२ शेतकऱ्यांचा समावेश आहे. मात्र, निवड झालेल्या सर्व शेतकऱ्यांना बियाणे मिळण्याऐवजी आतापर्यंत केवळ २७५ शेतकऱ्यांनाच बियाण्याचे वितरण झाले आहे. उर्वरित २५१ शेतकरी बियाण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

विशेष म्हणजे, निवड झाली, अनुदान मंजूर झाले; मात्र प्रत्यक्ष बियाणेच हातात पडले नाही, अशी अवस्था पात्र शेतकऱ्यांची झाली आहे. रब्बी हंगामातील पेरणीची वेळ जवळ येत असताना बियाण्याची प्रतीक्षा करणे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या धोकादायक ठरू शकते. वेळेत बियाणे उपलब्ध न झाल्यास पेरणीचे नियोजन कोलमडण्याची भीती कृषी विभागानेही आपल्या पत्रात व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री समितीच्या पत्राचा संदर्भ देत तालुका कृषी अधिकारी सुप्रिया कोकणी यांनी ९ नोव्हेंबर रोजी महाबीजच्या विभागीय व्यवस्थापकांना पत्र पाठविले आहे. उर्वरित २५१ शेतकऱ्यांची बियाण्याची गरज लक्षात घेऊन आवश्यक प्रमाणित हरभरा बियाणे तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी स्पष्ट मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांना अनुदानित दराने बियाणे वितरित करता यावे, यासाठी या प्रकरणाला प्राधान्य देऊन सकारात्मक कार्यवाही करण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

निवड यादीचा काय उपयोग, बियाणेच मिळत नसेल तर?

दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदानाचा आधार दिला जातो; मात्र लाभार्थी म्हणून निवड झाल्यानंतरही बियाणे मिळत नसेल, तर या योजनेचा नेमका लाभ कोणाला आणि कधी मिळणार, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. कृषी विभागाने आता महाबीजकडे बोट दाखविले असले, तरी शेतकऱ्यांच्या पेरणीचे नुकसान होऊ नये याची जबाबदारी कोण घेणार?

आता महाबीज प्रशासन या पत्राची कितपत गंभीर दखल घेते आणि उर्वरित २५१ शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष बियाणे कधी पडते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. कागदावरील मंजुरी आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचणारा लाभ यातील अंतर कमी करण्याची वेळ आली आहे.

थोडक्यात

ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र उट्टलवार यांचे कर्करोगाने निधन

वयाच्या ५६ व्या वर्षी निरामय हॉस्पिटलमध्ये घेतला अखेरचा श्वास, पत्रकारिता क्षेत्रात हळहळ

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दक्षिण नागपूरातील सच्चिदानंद नगर येथील रहिवासी पत्रकार राजेंद्र उट्टलवार यांनी दैनिक जनवाद या वृत्तपत्रातून सुरुवात करित नागपूर पत्रिका, दैनिक देशोन्नती आणि दैनिक पुढारी या



वृत्तपत्रांमध्ये आपल्या लेखणीच्या माध्यमातून योगदान देणारे ज्येष्ठ पत्रकार श्री. राजेंद्र उट्टलवार यांचे शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ७ वाजता. निरामय हॉस्पिटलमध्ये कर्करोगाने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ५६ वर्षे होते. त्यांच्या निधनाने नागपूरसह विदर्भातील पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली आहे. सच्चिदानंद नगर, प्लॉट क्रमांक ५ येथील रहिवासी राजेंद्र उट्टलवार हे अभ्यासू, अनुभवी आणि पत्रकारितेची जाण असलेले पत्रकार म्हणून परिचित होते. दैनिक पुढारी आणि दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. विविध विषयांचा सखोल अभ्यास करून वस्तुनिष्ठ वृत्तांकन करण्याची त्यांची हातोटी होती. त्यांच्या पत्रकारितेतील योगदानामुळे सहकारी पत्रकार आणि मित्रपरिवारात त्यांच्याविषयी विशेष आदर होता. ते नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे पदाधिकारी म्हणूनही कार्य केले होते. त्यांच्या अकाली निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रातील एक अभ्यासू सहकारी हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी स्वाती, मुले मंदार व अर्णव तसेच मोठा आप्तपरिवार आहे.

राजेंद्र उट्टलवार यांच्या निधनाबद्दल पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी, मित्रपरिवार आणि विविध स्तरांतून शोक व्यक्त करण्यात आले. मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार पार पडले. याप्रसंगी नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रह्मशंकर त्रिपाठी, संपादक अतुल पांडे, संजय देशमुख, विधान परिषदेचे आमदार कृपाल तुमाने, राष्ट्रवादीचे राजूभाऊ नागुलवार आणि रक्षक बंधूचे ज्ञानेश्वरराव रक्षक यांची उपस्थिती होती. या सर्वांच्या उपस्थितीत श्रद्धांजली वाहिली.

देव दर्शनाला जात असताना ज्येष्ठ विधिज्ञ राजु हेपट यांचे अपघाती निधन



दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा

वरोरा येथील प्रसिद्ध जेष्ठ विधिज्ञ वकील राजु हेपट हे मित्रासोबत मध्य प्रदेशातील बैतूल येथील मां बागलादेवीच्या दर्शनासाठी जात असताना वाटेतच बैतूल जवळील महामार्गावर मागून येणाऱ्या कंटेनर ने त्यांच्या कारला जबर धडक दिल्याने मागच्या सीटवर बसलेल्या एडवोकेट राजू हेपट व त्यांचे मित्र किन्नाके यांचा घटनास्थळीत मृत्यू झाला. तसेच कारमधील दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना जवळील दवाखान्यामध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.त्यांनी अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतला होता, त्यामुळे त्यांचा बराच चाहता वर्ग होता. त्यांच्या निधनाची बातमी वरोरा शहरात पसरताच अनेकांना धक्का बसला. त्याच्या निधनाने न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली आहे त्यांच्या पश्चात पत्नी,मुलगी, मुलगा व बराच आप्त परिवार आहे.

महात्मा फुले जयंती द्विशताब्दीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेला मुदतवाढ

निबंध अपलोड करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबरपर्यंत

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महात्मा फुले यांच्या जयंतीच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या स्मरणार्थ आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पदवी आणि पदव्युत्तर अशा दोन स्वतंत्र गटांत ही स्पर्धा घेण्यात येत असून, विद्यार्थ्यांना आता ऑनलाइन नोंदणी आणि निबंध सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे. या स्पर्धेत पदवी गटासाठी 'चवदार तळ्याचा सत्याग्रह : सामाजिक क्रांतीची नांदी', तर पदव्युत्तर गटासाठी 'महात्मा फुले यांची विचारधारा आणि समकालीन सामाजिक आव्हाने' हे निबंधाचे विषय निश्चित करण्यात आले आहेत. स्पर्धेसाठी ऑनलाइन नोंदणीची अंतिम मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच ऑनलाइन निबंध अपलोड करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे.

दोन्ही गटांसाठी स्वतंत्र पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांकासाठी १० हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७ हजार ५०० रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी ५ हजार रुपये असे पदवी गटातील पारितोषिकांचे स्वरूप आहे. पदव्युत्तर गटासाठी प्रथम क्रमांकाला ५० हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ४० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकाला ३० हजार रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी मराठी किंवा इंग्रजी भाषेत निबंध स्वहस्ताक्षरात लिहिणे आवश्यक आहे. त्यानंतर ऑनलाइन नोंदणी करून निबंधाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरील प्रोग्राम विभागात अपलोड करावी. स्पर्धेच्या सविस्तर सूचना, अटी, शर्ती आणि कार्यपद्धती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी मुदतवाढीचा लाभ घेऊन या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी https://dbaspratishthan.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

महिला लोकशाही दिन सोमवारी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्या अनुषंगाने जिल्हास्तरावर उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

नागपूर शहरातील रस्ते अपघात रोखण्यासाठी कठोर वाहतूक अंमलबजावणी करा!

मा. न्यायमूर्ती अभय मनोहर सप्रे यांचे निर्देश, सर्व पोलिस ठाणे व संबंधित यंत्रणांनी कालबद्ध आणि प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सर्वोच्च न्यायालयाच्या रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा माजी न्यायमूर्ती अभय मनोहर सप्रे यांनी नागपूर शहरातील रस्ते अपघात आणि अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी कठोर आणि व्यापक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. नागपूर शहरातील वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना अपघात रोखण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जानेवारी ते ऑक्टोबर २०२५ आणि जानेवारी ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील रस्ते अपघातांच्या विश्लेषणानुसार सन २०२५ मध्ये २५३ नागरिकांचा अपघाती मृत्यू झाला होता तर सन २०२६ मध्ये ही संख्या २२४ झाली आहे. मृत्यूंच्या संख्येत सुमारे ११ टक्के घट झाली असली तरी दहा महिन्यांत २२४ नागरिकांचा मृत्यू होणे ही गंभीर बाब असल्याचे विश्लेषणातून स्पष्ट झाले आहे. शहरातील १४ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत अपघाती मृत्यू वाढले असून १० अतिअपघातप्रवण मार्गांपैकी ७ मार्गांवर मृत्यूंची संख्या वाढली आहे. अतिवेग हा अपघाती मृत्यूंचा प्रमुख घटक असून रात्री ९ ते १२ हा सर्वाधिक धोकादायक कालावधी असल्याचेही निदर्शनास आले आहे. दुचाकीस्वारांचा मृत्यूमधील वाटा सर्वाधिक असून हेल्मेटचा वापर न करणे, मद्यप्राशन करून वाहन चालविणे, रॉंग साईडने वाहन चालविणे आणि अवजड वाहनांशी संबंधित अपघात याबाबी विशेष चिंतेच्या आहेत. या पार्श्वभूमीवर मा. न्यायमूर्ती अभय मनोहर सप्रे यांनी नागपूर शहरात कठोर उपाययोजना व अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.



वाहन चालकांना हेल्मेट सक्ती

दुचाकीस्वार तसेच सहप्रवाशाने हेल्मेट वापरणे अनिवार्य करण्यासाठी कठोर अंमलबजावणी करावी. पेट्रोल पंपांवर हेल्मेट वापरासंदर्भात तपासणी करून 'No Helmet, No Petrol' या धोरणाची अंमलबजावणी करावी. BIS, ISI प्रमाणित दर्जेदार हेल्मेट वापरण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी.

वाहन विमा सक्ती

वैध मोटार वाहन विमा नसलेल्या वाहनांविरुद्ध विशेष तपासणी मोहिम राबवावी. पेट्रोल पंपांवर 'No Insurance, No Petrol या निर्देशाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यवाही करावी.

सीट बेल्ट वापराची सक्ती

चारचाकी वाहनांच्या चालकांसह कायद्यानुसार सीट बेल्ट वापरणे आवश्यक असलेल्या सर्व प्रवाशांकडून त्याचा वापर सुनिश्चित करावा. सीटबेल्ट न वापरणाऱ्यांविरुद्ध नियमित आणि कठोर कारवाई करावी.

पादचारी सुरक्षा व मॉडेल स्ट्रीट्स

शहरातील निवडक रस्त्यांवर पादचारी सुरक्षिततेच्या दृष्टीने Model Streets विकसित करण्याची कार्यवाही करावी. फुटपाथवरील अतिक्रमणे हटवून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित व अडथळामुक्त मार्ग उपलब्ध करून द्यावेत. पादचारी क्रॉसिंग, शाळा, रुग्णालये आणि बाजारपेठांच्या परिसरात विशेष उपाययोजना कराव्यात.

CSR अंतर्गत अत्याधुनिक Traffic Park उभारणी

नागपूर शहरात उरफ च्या माध्यमातून अत्याधुनिक Traffic Park उभारण्याची योजना तयार करावी. या पार्कमध्ये चारचाकी वाहनांसाठी दोन आणि दुचाकी वाहनांसाठी दोन ड्रायव्हिंग सिम्युलेटर उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सिम्युलेटरच्या स्क्रीनवर नागपूर शहरातील प्रत्यक्ष रस्ते, चौक आणि वाहतूक परिस्थितीचे चित्रण असावे. वाहनचालकांच्या नियमभंगाचे विश्लेषण करून त्यांच्या ड्रायव्हिंग कौशल्याचे मूल्यमापन करता यावे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर वाहनचालक, प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाहतूक पोलिस आणि संबंधित यंत्रणांना प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी. शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, शासकीय विभाग आणि कॉर्पोरेट संस्थांमधील व्यक्तींना या प्रशिक्षणासाठी पाठविण्याबाबत नियोजन करावे. या प्रकल्पासाठी एखाद्या वाहननिर्मिती कंपनीशी उरफ अंतर्गत सहकार्याबाबत संपर्क साधावा. Traffic Park मध्ये कुटुंबांसाठी उपयुक्त सुविधा आणि खाद्यपदार्थांची व्यवस्था असलेली eateries देखील असावेत, असे निर्देश दिले.

न्यायमूर्ती सप्रे जानेवारी २०२७ मध्ये नागपूरला पुन्हा भेट देणार असून त्यावेळी Traffic Park ची जागा, पायाभूत सुविधा, उरफ आणि सिम्युलेटरच्या आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करणार आहे. त्यापूर्वी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण करावी, असे सांगितले. शाळा व महाविद्यालय परिसरात अल्पवयीन वाहन चालकांविरुद्ध कारवाई, शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसच्या परिसरात विशेष तपासणी मोहीम राबवावी. अल्पवयीन वाहनचालक, विनापरवाना वाहन चालविणारे आणि हेल्मेट न वापरणारे यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करावी. 'No Helmet – No Attendance' या संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी शैक्षणिक संस्थांशी समन्वय साधावा. विद्यार्थ्यांसाठी रस्ते सुरक्षा जनजागृती कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित कराव्यात.

मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई

विशेषतः रात्री, सप्ताहअखेर आणि सण-उत्सवांच्या काळात नाकाबंदी व ब्रेथ ॲनालायझर तपासणी वाढवावी. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध लागू कायदेशीर तरतुदींनुसार कठोर कारवाई करावी. हॉटेल, बार आणि मद्यविक्री दुकानांचे मालक व व्यवस्थापक यांची बैठक घेऊन ग्राहकांना मद्यप्राशनानंतर वाहन चालविण्यापासून परावृत्त करण्याबाबत सूचना द्याव्यात. संबंधित आस्थापनांनी रस्ते सुरक्षा संदेश प्रदर्शित करावेत व पोलिसांना सहकार्य करावे.

रॉंग साईड वाहन चालकांविरुद्ध विशेष मोहिम

रॉंग साईडने वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध विशेष पथके नेमून कारवाई करावी. गंभीर स्वरूपाच्या प्रकरणांत लागू कायदेशीर तरतुदींनुसार कायद्याने परवानगी असलेल्या प्रकरणांत वाहन ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी.

सिग्नल जंपिंगविरुद्ध कठोर अंमलबजावणी

सिग्नल तोडणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध सीसीटीव्ही आणि प्रत्यक्ष रस्त्यावरील तपासणीच्या माध्यमातून कारवाई करावी. वारंवार नियमभंग करणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवून कायद्यानुसार कठोर कार्यवाही करावी.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्त्यांना गती

२५ विधानसभा मतदारसंघांत सह-अध्यक्षांची नियुक्ती, फडणवीस सरकारचा निर्णय, तातडीने कार्यवाही करण्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेची अमलबजावणी प्रभावी व वेगवान होण्यासाठी राज्यातील २५ विधानसभा मतदारसंघांतील क्षेत्रस्तरीय समित्यांवर 'सह-अध्यक्ष' नियुक्त करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला. या संदर्भात महसूल विभागाने शासन निर्णय जारी केला आहे.

राज्यातील ९१ विधानसभा मतदारसंघांमध्ये यापूर्वी १५ जुलै २०२६ रोजी सह-अध्यक्षांची निवड करण्यात आली होती. त्यानंतर आता उर्वरित २५ मतदारसंघांतील समितीच्या कामकाजाला गती देण्यासाठी नवीन सह-अध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. या नियुक्त प्रतिनिधींचा समित्यांमध्ये तात्काळ समावेश करून कामकाज सुरू करण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले.

नियुक्ती पुढीलप्रमाणे

शहादा - नितीन शंकर पाटील
हिंगणा - धनराज विठोबाजी आष्टणकर
तिरोरा - चत्रभुज सेगोजी बिसेन
गडचिरोली (अ.ज.) - रमेश कवळू बारसागडे
चंद्रपूर (अ.जा.) - नामदेव बबनराव डाहुले
चिमूर - राजू कवडुजी झाडे पाटील
वरोरा - विठ्ठल हरबाजी लेडे
यवतमाळ - श्याम उर्फ विनोदचंद्र द्वारकाप्रसाद जयस्वाल
हिंगोली - शंकर घनश्याम बोराडे
फुलंब्री - राणी ज्ञानेश्वर सोनवणे
डहाणू (अ.ज.) - ज्योती प्रशांत पाटील
विक्रमगड (अ.ज.) - सुशील अनंतराव औसरकर
भिवंडी पश्चिम - गजानन गंगाराम आसवारे
खडकवासला - नवनाथ बबनराव तापुरे
शेवगाव - राधाकिसन नारायण कर्डिले
श्रीगोंदा - दादासाहेब पोपटराव जंगले पाटील
बीड - डॉ. योगेश भारतभूषण क्षीरसागर
केज (अ.जा.) - विजयकांत विक्रमराव मुंडे
लातूर शहर - चंद्रकांत विनायक खटके
सोलापूर दक्षिण - मनीष सुभाष देशमुख
शहादा - प्रकाश बळवंत देशमुख
हातकणंगले - मकरंद बाळकृष्ण बोराडे
सांगली - राहुल महावीर सकळे
शिराळा - अशोक बाबुराव पाटील
पलूस-कडेगाव - सत्यजित वसंतराव यादव देशमुख

गावपातळीवरील शेत आणि पाणंद रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी ही विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. स्थानिक पातळीवरील सह-अध्यक्षांच्या नेमणुकीमुळे शेतकऱ्यांच्या अडीअडचणी थेट समितीपर्यंत पोहोचून रस्त्यांची कामे मार्गी लागण्यास मोठी मदत होणार आहे, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

आज रंगणार सुप्रसिद्ध गायक पवनदीप राजन अन् गायिका चेतना भारद्वाज यांच्या जादुई आवाजाची सुरेल मैफिल

मनपा 'गरोबा महोत्सव अंतर्गत' संगीत संध्या कार्यक्रमाचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर नागपूर महानगरपालिकेद्वारा गरोबा महोत्सवांतर्गत संगीत संध्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार १४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सरदार वल्लभ भाई पटेल कच्छीविसा मैदान लकडगंज येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक इंडियन आयडल फेम पवनदीप राजन आणि गायिका चेतना भारद्वाज यांच्या जादुई आवाजाची सुरेल मैफिल रंगणार आहे. हा संपूर्ण कार्यक्रम निःशुल्क असून, नागरिकांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे असे आवाहन महापौर निता ठाकरे आणि कार्यक्रमाचे संयोजक तथा सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी केले आहे.



एक तासापूर्वी प्रवेश करा

गरोबा महोत्सव अंतर्गत आयोजित संगीत संध्या कार्यक्रमात नागरिकांना प्रवेश निःशुल्क असणार आहे. प्रवेशाकरिता रसिक प्रेक्षकांना शहरातील विविध ठिकाणी लावण्यात आलेले क्यू आर कोड स्कॅन करून त्यावर नोंदणी करावी लागणार आहे. नोंदणी झाल्यावर पास उपलब्ध होईल. एका पास वर एका व्यक्तीला प्रवेश दिला जाणार असून पास असलेल्या रसिक प्रेक्षकांनी एकातासा पूर्वी प्रवेश घ्यावा असे आवाहन सत्तापक्ष नेते तथा कार्यक्रमाचे संयोजक नरेंद्र बोरकर यांनी दिली.

मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई आयोजित ५१ वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा

दिवाळी अंक संपादक व प्रकाशकांना आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

'दिवाळी आणि दिवाळी अंक' हे मराठी माणसाच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक जीवनातील अतूट नाते आहे. दिवाळीच्या सणासोबत घराघरांत पोहोचणारा दिवाळी अंक हा केवळ मनोरंजनाचा साहित्यप्रकार नसून मराठी भाषेच्या वाङ्मयीन समृद्धीचा, वैचारिक प्रगल्भतेचा आणि सांस्कृतिक अभिरुचीचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे.

मराठी दिवाळी अंकांची परंपरा शंभर वर्षांहून अधिक जुनी आहे. १९०९ मध्ये का. र. मित्र यांच्या संपादनाखाली प्रकाशित झालेल्या 'मनोरंजन'च्या दिवाळी अंकाने या परंपरेला स्वतंत्र ओळख मिळवून दिली. त्यानंतर कथा, कादंबरी, कविता, नाटक, विनोद, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्रे, वैचारिक लेख, संशोधन, सामाजिक आणि सांस्कृतिक विषय अशा विविध साहित्यप्रकारांनी दिवाळी अंकांचे विश्व अधिक समृद्ध केले. अनेक नामवंत साहित्यिकांचा लेखनाला, नवोदित लेखकांच्या प्रतिभेला आणि नव्या विचारप्रवाहांना दिवाळी अंकांनी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. काळ बदलला, माध्यमे बदलली, तंत्रज्ञान बदलले; मात्र दिवाळी अंकांविषयीचे मराठी वाचकांचे आकर्षण आजही कायम आहे.

या समृद्ध साहित्यपरंपरेचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीपर्यंत तिचे महत्त्व पोहोचविण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांची आहे. याच साहित्यिक आणि सांस्कृतिक जाणिवेतून मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई गेली ७८ वर्षे सातत्याने सामाजिक , सांस्कृतिक आणि वृत्तपत्र लेखनाच्या क्षेत्रात विविध उपक्रम कार्यक्रमांच्या माध्यमातून कार्यरत आहे.

मुंबईसह महाराष्ट्रातील पत्रकारिता, साहित्य, संस्कृती आणि सामाजिक क्षेत्रात संस्थेने विविध उपक्रम, कार्यक्रम आणि विधायक चळवळींच्या माध्यमातून आपले योगदान दिले आहे. संस्थेच्या वतीने गेली ५१ वर्षे अखंडपणे राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. पाच दशकांहून अधिक काळ सातत्याने सुरू असलेल्या या स्पर्धेला महाराष्ट्रातील संपादक, प्रकाशक, लेखक आणि साहित्यप्रेमींची मोठी लोकमान्यता लाभली आहे. राज्यभरातून मोठ्या संख्येने दिवाळी अंक सहभागी होणारी ही एक महत्त्वपूर्ण साहित्यिक स्पर्धा म्हणून ओळखली जाते.

स्पर्धेविषयी माहिती देताना रवींद्र मालुसरे म्हणाले की, आमची स्पर्धा म्हणजे केवळ पुरस्कार नव्हे, तर साहित्यनिर्मितीचा सन्मान आणि संपादकीय कर्तृत्वाची दखल! या स्पर्धेच्या माध्यमातून विविध विषयांवर



दर्जेदार साहित्यनिर्मिती करणाऱ्या संपादक आणि प्रकाशकांच्या कायार्ची आजपर्यंत दखल घेतली गेली आहे. दिवाळी अंकातील आशयघन लेखन, वैचारिक मांडणी, साहित्यिक गुणवत्ता, सामाजिक भान, विषयवैविध्य, कलात्मक सजावट आणि संपादकीय दृष्टिकोन अशा विविध पैलूंचे परीक्षण करून पुरस्कारांसाठी अंकांची निवड केली जाते.

सर्वोत्कृष्ट अंकासाठी मनोरंजनकार का. र. मित्र स्मृती पुरस्कार प्रदान केला जातो, त्याचबरोबर उत्कृष्ट आणि उल्लेखनीय अंक म्हणून निवडले जातात.आपल्या अंकातील साहित्य, कल्पकता, वैचारिक समृद्धी आणि संपादकीय मेहनत ही मराठी साहित्यविश्वाच्या जडण घडणीतील महत्त्वाची भर आहे. आपल्या सहभागामुळे केवळ स्पर्धेची व्यापती वाढणार नाही, तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात निर्माण होणाऱ्या विविधांगी साहित्याचा परिचय व्यापक वाचकवर्गाला होण्यासही मदत होईल.

आज डिजिटल माध्यमांचे युग असले तरी मुद्रित दिवाळी अंकांचे महत्त्व आणि त्यांचे सांस्कृतिक मूल्य वेगळेच आहे. बदलत्या काळानुसार डिजिटल आणि मुद्रित अशा दोन्ही माध्यमांतून दिवाळी अंकांची परंपरा अधिक समृद्ध व्हावी, हीच अपेक्षा आहे.

यंदाही ५१ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरून मराठी दिवाळी अंक प्रकाशित करणाऱ्या सर्व संपादक, प्रकाशक, संस्था आणि प्रकाशन समूहांना आमचे मनःपूर्वक आवाहन आहे की, त्यांनी आपल्या प्रकाशित दिवाळी अंकाच्या दोन प्रती स्पर्धेसाठी पाठवून या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे. स्पर्धेसाठी प्रकाशित दिवाळी अंकाच्या दोन प्रती पाठविण्याचा पत्ता : रवींद्र मालुसरे (अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई), ६१२, घरकुल सोसायटी, बिल्डिंग नं. १०, साई सुंदर नगर, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५. संपर्क : ९३२३११७७०४

शब्दवेली
साहित्य विशेष
दैनिक सिंहवाणी वृत्त
५ दिनांक : शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

संबंधित घटकांची समृद्धताच ग्रंथालय समृद्धी

(राष्ट्रीय ग्रंथालय आठवडा विशेष : १४ ते २० नोव्हेंबर २०२६)

डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

जीवनात अमूल्य शिक्षणाला जे महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व ग्रंथालयांनाही आहे. कोणत्याही काळात किंवा कोणत्याही परिस्थितीत ग्रंथालयांचे महत्त्व कमी झालेले नाही; उलट काळानुसार ते वाढतच गेले आहे. आपल्या भारतातील प्राचीन नालंदा आणि तक्षशिला या जगप्रसिद्ध विद्यापीठांची समृद्ध ग्रंथालये असोत किंवा आजच्या आधुनिक युगात साधनसंपन्न ज्ञानकेंद्रे म्हणून स्थापित झालेली डिजिटल ग्रंथालये असोत, शिक्षण आणि ज्ञानाचे प्रमुख स्रोत म्हणून सर्वत्र ग्रंथालयांचे महत्त्व अतुलनीय आहे. आज ग्रंथालयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे, जेणेकरून वाचकांना जलद गतीने दर्जेदार ग्रंथालयीन सेवा पुरवता येतील. यामुळे वाचकांचा आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचा वेळ व श्रम वाचून ग्रंथालयशास्त्राच्या पाचही नियमांचे पूर्णपणे पालन होते.

ग्रंथालयाची निर्मिती व्यवसाय किंवा पैसा कमावण्याच्या उद्देशाने होत नाही; ती शिक्षणसेवा किंवा समाजसेवेच्या माध्यमातून लोककल्याणासाठी ज्ञानार्जनाची केंद्रे म्हणून केली जाते. आज सर्वत्र, प्रत्येक क्षेत्राला पैसा कमावण्याचे साधन बनवले गेले आहे. समाजसुधारकांनी समाजाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून समाजसेवेचा भाग म्हणून शाळा, महाविद्यालये आणि ग्रंथालये स्थापन केली होती; मात्र काळानुसार त्यात बदल झाले आहेत. आज शिक्षणक्षेत्रातील बहुतांश संस्था देखील पैसा कमावण्याची केंद्रे बनली आहेत. परंतु ग्रंथालयांमधून उत्पन्नाचे चांगले स्रोत उपलब्ध नसल्यामुळे उद्योजक या क्षेत्रात विशेष रस घेत नाहीत. सर्वसामान्य लोकांसाठी सरकारद्वारे संचालित ग्रंथालयेच एक साधन म्हणून दिसून येतात. केंद्र सरकारद्वारे संचालित शिक्षणकेंद्रे किंवा प्रसिद्ध खासगी शाळा-महाविद्यालये आपल्या शैक्षणिक गरजांनुसार ग्रंथालयांचा मोठ्या प्रमाणात विकास करतात. मात्र अनेक राज्य सरकारांद्वारे संचालित अनेक सार्वजनिक ग्रंथालये, अनुदानित शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील ग्रंथालये, तसेच स्थानिक प्रशासनाची ग्रंथालयेही अनेक वर्षांपासून समस्यांशी झुंजताना दिसतात.

ग्रंथालयांच्या विकासासाठी सर्वप्रथम विकसित दृष्टिकोनाची आवश्यकता आहे; कारण आपण अनेकदा पाहतो की, ज्या महानगरपालिका किंवा नगरपालिकांचे वार्षिक बजेट हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे, तेथील ग्रंथालयांची स्थिती वर्षानुवर्षे तशीच राहिलेली आहे. सरकार सध्या ग्रंथालयांच्या विकासावर भर देण्याचा प्रयत्न करत असले, तरी विकासाचा परिणाम ग्रंथालयांशी संबंधित सर्व घटकांवर दिसून आला पाहिजे. महाराष्ट्र राज्यातील अनुदानित सार्वजनिक ग्रंथालयांचे अ, ब, क आणि ड असे चार वर्ग करण्यात आले आहेत. याच वर्गवारीनुसार ग्रंथालयीन खर्च, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि साहित्य खरेदी केली जाते. हे जाणून कदाचित आपणास आश्चर्य वाटेल की, अ, ब, क आणि ड या वर्गातील अनेक ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे वेतन एका मजुराच्या वेतनापेक्षाही कितीतरी पटींनी कमी आहे. तेही आजच्या काळात, जेव्हा महागाईमुळे आपण दररोज त्रस्त होतो. अशा परिस्थितीत अनेक ग्रंथालय कर्मचाऱ्यांना महिन्याला अडीच ते तीन हजार रुपये वेतन मिळते. या वेतनात आजच्या काळात जगणे शक्य आहे का? महाराष्ट्र राज्यात बहुतांश अनुदानित ग्रंथालये संस्थांद्वारे चालवली जातात. मात्र शाळा-महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांना सरकारी नियमांनुसार वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे, जेव्हा की या अनुदानित ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांना कोणतीही वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही.

अलीकडेच अशाच एका सार्वजनिक ग्रंथालयातील 'वर्ग अ - इतर' श्रेणीतील ग्रंथालय कर्मचाऱ्याशी माझे बोलणे झाले. त्यांनी सांगितले की, १९७७ मध्ये महिन्याला ५० रुपये वेतन मिळत होते, जे आता १२,००० रुपये झाले आहे. म्हणजे गेल्या ४९ वर्षांत वेतन केवळ बारा हजार रुपयांपर्यंतच पोहोचू शकले आहे. महाराष्ट्राच्या कामगार आयुक्तांनी अधिसूचित केलेले, महाराष्ट्रातील दुकाने आणि आस्थापनांमधील अकुशल कामगारांसाठीचे नवीनतम किमान वेतनही या वेतनापेक्षा जास्त आहे. आजच्या काळात कुटुंबप्रमुखाला या वेतनातून संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी सहजपणे पार पाडणे शक्य आहे का? या परिस्थितीत ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी आपल्या वास्तविक परिस्थितीची सरकारला अनेक वेळा जाणीव करून दिली; मात्र त्यांना यश मिळाले नाही. कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटना स्थापन करून मंत्र्यांची भेट घेतली, निवेदने दिली आणि आंदोलने केली; परंतु कोणताही तोडगा निघाला नाही. आता ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, योग्य तोडगा निघाला नाही, तर आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरणार नाही; जगणे अतिशय कठीण झाले आहे. त्यांची मानसिकता या टोकापर्यंत पोहोचली आहे. ज्ञानरूपी भंडार समृद्ध करून आपल्यापर्यंत ग्रंथालयीन सेवा अखंडितपणे पोहोचवणाऱ्या ग्रंथालय कर्मचाऱ्यांची ही परिस्थिती आहे.

आज देशातील अनेक राज्यांमध्ये विविध क्षेत्रांतील ज्ञानकेंद्रांच्या सर्व स्तरांवर ग्रंथालय कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. जुने कर्मचारी सेवानिवृत्त होतात; मात्र त्यांच्या जागी नवीन कर्मचारी येत नाहीत, कारण अनेक वर्षांपासून पदभरती झालेली नाही. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित शाळांच्या ग्रंथालयांमध्ये शोधल्यास कदाचित एखादा कर्मचारी दिसेल; अन्यथा बहुतांश अनुदानित शाळांची ग्रंथालये कुशल कर्मचाऱ्यांशिवायच चालवली जात आहेत.

महाराष्ट्रातील अनेक वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ग्रंथपालांची पदे रिक्त आहेत. अनेक विद्यापीठांमध्येही अशीच परिस्थिती आहे. गरज पडल्यास काही काळासाठी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नेमून कामकाज चालविले जाते. दुसरीकडे, या विषयात उच्चशिक्षित वर्गामध्ये भयावह बेरोजगारीची परिस्थिती आहे. कंत्राटी पद्धतीवरील ग्रंथालयीन कर्मचाऱ्याच्या एका छोट्या पदासाठी, ज्याचे मासिक वेतन किमान वेतनाच्या आसपास असेल, अशा पदासाठीही शेकडो उच्चशिक्षित उमेदवार रांगेत उभे असतात. २० ते २५ वर्षांपूर्वी या विषयात उच्च शिक्षण घेतलेले अनेक जण आजही या क्षेत्रातील रोजगारापासून वंचित आहेत. जीवन जगण्यासाठी ते नाइलाजाने मिळेल ते काम करतात. अलीकडेच महाराष्ट्र राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक (समकक्ष ग्रंथपाल) पदासाठी एक कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम ठरवण्यात आल्याच्या भ्रष्टाचाराच्या बातम्या वृत्तपत्रांत वाचल्या होत्या. अशा बातम्या नेहमीच सातत्याने येत असतात. ग्रंथालयांमध्ये कुशल कर्मचाऱ्यांची कमतरता, योग्य वेतनश्रेणीचा अभाव, ग्रंथालयांच्या विकासासाठी निधीची कमतरता, ग्रंथालयशास्त्र विषयात शिक्षण घेतलेल्या तरुणांमधील बेरोजगारी, पदभरती न होणे, भ्रष्टाचार आणि दिरंगाई या समस्या ज्ञानकेंद्रे असलेल्या ग्रंथालयांच्या विकासात अडथळा ठरतात. सरकारने या समस्यांचे लवकरात लवकर निराकरण केले पाहिजे.

देशाच्या नवीन शिक्षणप्रणालीसाठी आणि समाजाला जागतिक दर्जाच्या ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हे आवश्यक आहे.

ग्रंथालय ही अनेक घटकांनी मिळून तयार झालेली अत्यंत महत्त्वाची साखळी आहे. त्यातील एक जरी घटक कमकुवत झाला, तरी ग्रंथालयाचा दर्जा घसरतो; कारण ग्रंथालयीन सेवा थेट बाधित होतात. सर्व घटकांची समृद्धताच समृद्ध ग्रंथालय आहे. यामध्ये दर्जेदार साहित्य सामग्री, वाचकांच्या मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी उत्तम ग्रंथालयीन सेवा, तांत्रिक आणि प्रगत साधनसंपत्ती, कुशल कर्मचारी, कर्मचाऱ्यांना योग्य वेतनश्रेणी, वेळोवेळी पदभरती, पुरेसा निधी आणि सातत्याने विकसित होत असलेल्या ग्रंथालयीन आराखड्याची अंमलबजावणी करण्याचा दृष्टिकोन अत्यंत आवश्यक आहे. या सर्व गोष्टी एकत्र आल्यास समृद्ध आणि विकसित ग्रंथालयाची संकल्पना प्रत्यक्षात साकार होते; हे प्रत्येक देशाचे, सरकारचे आणि समाजाचे उद्दिष्ट असते. आज कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ग्रंथालयांच्या विकासासाठी महत्त्वाचा स्तंभ ठरत आहे.

समृद्धता आपल्याला विकसित समाजनिर्मितीच्या प्रगतीपथावर पुढे घेऊन जाते. प्रत्येक विद्यार्थी, प्रत्येक नागरिक आणि जगातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत दर्जेदार ग्रंथालयीन सेवा सहजपणे पोहोचल्या पाहिजेत; कारण माहिती आणि ज्ञानाची भूक ही प्रत्येकाची गरज आहे. हे तेव्हाच शक्य होईल, जेव्हा ग्रंथालयातील प्रत्येक घटकाची समृद्धता वाढेल. तेव्हाच हे सर्व घटक मिळून विकसित ग्रंथालयाचे यशस्वी संचालन करतील.

-(महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)
- ०८२३७४१७०४१

निरोगी बालविश्व : काळाची गरज!

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

आज राष्ट्रीय बालक दिन.हा दिवस केवळ बालकांच्या आनंदाचा, हक्कांचा आणि स्वप्नांचा उत्सव नाही,तर त्यांच्या आरोग्याचा आणि भविष्याचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. देशाचे उद्याचे भविष्य असलेल्या बालकांचे बालपण निरोगी, आनंदी आणि निकोप असणे आवश्यक आहे. मात्र,बदलत्या काळात बालकांच्या आरोग्यापुढे अनेक नवी आव्हाने उभी राहत आहे.एका बाजूला कुपोषणाची समस्या कायम असताना, दुसऱ्या बाजूला लठ्ठपणा, मधुमेह, मानसिक ताण आणि जीवनशैलीशी संबंधित आजार बालवयातच डोके वर काढत आहे. बालकांच्या आरोग्याचे हे बदलते चित्र चिंताजनक मानल्या जाते.

देशातील बालकांसमोर कुपोषण हा आजही अतिगंभीर प्रश्न आहे. गरिबी, आर्थिक विषमता,अज्ञान, सकस आहाराचा अभाव आणि आरोग्य सुविधांपर्यंत पोहोचण्याच्या अडचणींमुळे अनेक बालकांची शारीरिक व बौद्धिक वाढ अपेक्षेप्रमाणे होत नाही. वयानुसार कमी उंची रक्तक्षय आणि रोगप्रतिकार शक्तीचा अभाव यामुळे बालकांच्या विकासावर परिणाम होतो.बालपणी मिळणारे पोषण हे संपूर्ण आयुष्याच्या आरोग्याचा पाया असतो.त्यामुळे कुपोषणाकडे केवळ अन्नाची कमतरतेचे प्रश्न म्हणून न पाहता, सार्वजनिक आरोग्याच्या समतोलाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. दुसरीकडे,शहरीच नव्हे तर ग्रामीण भागातही बालकांमध्ये लठ्ठपणाची समस्या वाढत आहे. फास्टफूड, पॅकिंग खाद्यपदार्थ, चिप्स, बिस्किट चॉकलेट, शीतपेये आणि साखरयुक्त पदार्थ मुलांच्या आहाराचा भाग बनत आहे. जाहिरातींच्या प्रभावामुळे अशा पदार्थांचे आकर्षण वाढते. घरगुती सकस आहारापेक्षा चटकदार पदार्थांना पसंती मिळत आहे. याचा परिणाम लठ्ठपणा, उच्च रक्तदाब आणि टाईप-टू मधुमेह सारख्या आजारांच्या वाढत्या धोक्यापासून दिसून येते.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल, सोशल मिडीया, टॅब, टीव्ही, व्हिडिओ गेम्स हे बालकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. तंत्रज्ञानाचा योग्य वापर उपयुक्त असला तरी त्याचा अतिवापर शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी घातक ठरू पाहत आहे. तासन्तास मोबाईलच्या स्क्रीनसमोर बसून राहिल्यामुळे शारीरिक हालचाली कमी होतात. डोळ्यावर ताण येतो, झोपेचे तंत्र बिघडते आणि एकाग्रतेवर परिणाम होऊ शकते. त्यामुळे आजच्या काळात बालकांसाठी डिजिटल डिटॉक्स ही संकल्पना महत्त्वाची बनली आहे. म्हणजेच ठराविक वेळ मोबाईल, टीव्ही, आणि इतर डिजिटल उपकरणांपासून दूर राहणे होय. बालकांना जेवण करत असताना मोबाईल न वापरणे, झोपण्यापूर्वी स्क्रीनपासून दूर राहणे आणि दररोज काही वेळ डिजिटल उपकरणाशिवाय वेळ घालवणे, अशा सवयी पालकांनी मुलांमध्ये रुजवायला हव्यात.

आज डिजिटल डिटॉक्स ला मैदानी खेळाची जोड देणे आवश्यक आहे. क्रिकेट, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, धावणे, सायकलींग आणि पोहणे यासारख्या खेळांमुळे मुलांचा शारीरिक विकास होतो. स्नायू मजबूत होतात. हाडांची वाढ चांगली होते. लठ्ठपणाचा धोका कमी होतो आणि संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात. खेळामुळे मुलांचा तणतणावही कमी होतो. दुर्दैवाने मैदानी कमी होत आहे आणि उपलब्ध मैदाना ऐवजी मुलांचा अधिक वेळ मोबाईलच्या आभासी जगात खर्च होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी शाळा व स्थानिक स्वराज्य संस्थांनी खेळाच्या मैदानाचे संरक्षण आणि क्रीडा सुविधांची उपलब्धता यांना प्राधान्य द्यायला हवे. याशिवाय मुलांमध्ये वाढणारा मानसिक ताण, अभ्यासाचे दडपण, स्पर्धा, एकटेपणा आणि सोशल मीडियाचा प्रभाव याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.मुलांना पुरेशी झोप, मोकळा संवाद, खेळण्यासाठी वेळ आणि भावनिक आधार मिळणे आवश्यक आहे. याची जबाबदारी कुटुंबाचीआहे.

कुपोषण आणि लठ्ठपणा हे परस्परविरोधी वाटणारे प्रश्न असले तरी दोन्हींच्या मुळाशी असंतुलित पोषण आहे.याकडे मुलांना केवळ पोटभर अन्न नव्हे, तर सकस आणि संतुलित आहार मोहीम मिळणे महत्त्वाचे आहे. आहारात डाळी, कडधान्य दूध,फळे आणि हिरव्या पालेभाज्यांचा समावेश असावा. शाळांमध्ये पोषण शिक्षण, नियमित आरोग्य तपासणी आणि शारीरिक शिक्षणावर विशेष भर दिला पाहिजे. राष्ट्रीय बालदिनाच्या निमित्ताने बालकांच्या आरोग्याचा व्यापक विचार करण्याची गरज आहे. मुलांच्या हातात खेळाचे साहित्य द्यावे. स्क्रीन समोरील वेळ कमी करून मैदानावरचा वेळ वाढवावा आणि जंकफूड ऐवजी सकस खाद्यांची सवय लावावी. वासाही पालक, शाळा, समाज आणि शासन या सर्वांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे.आज बालकांना केवळ डिजिटल जगाचे ज्ञान देऊन चालणार नाही.तर त्यांना निसर्गाच्या सानिध्यात खेळणारे, धावणारे आणि निरोगी आयुष्य जगणारे बालपणही द्यावे लागेल. कारण बालपण निरोगी असेल तरच, राष्ट्राचे भविष्य सदृढ आणि समृद्ध होईल!

मो : ९१३०८३५४५८

खापरखेड्यात विठ्ठल-विठ्ठलचा गजर; ४० वर्षांची भक्तीपरंपरा अखंड सुरू! वारकऱ्यांच्या स्वागतासाठी गाव सज्ज



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

वारकरी संप्रदायाची भक्ती परंपरा आणि सामाजिक एकात्मतेचा अनोखा संगम खापरखेड्यात अनुभवायला मिळत आहे. कोजागिरी पौर्णिमेपासून सुरू झालेली खापरखेड्यातील पारंपरिक काकडा आरतीची दिंडी त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत सलग ३१ दिवस गावात भक्तिमय वातावरण निर्माण करीत आहे. विठ्ठल-विठ्ठलच्या जयघोषाने पहाटेच्या शांत वातावरणात अवघे गाव भक्तिरसात न्हाऊन निघत आहे. हरिभक्त महाराज शांतारामा गावंडे यांच्या उपस्थितीत दररोज या दिंडीचे आयोजन केले जाते,दररोज सकाळी ५ वाजता हनुमान मंदिरात काकडा आरती होते. त्यानंतर सकाळी ६.३० वाजता दिंडी निमंत्रित कुटुंबांच्या घरी प्रस्थान करते. दिंडीच्या स्वागतासाठी रस्तोरस्ती आकर्षक रांगोळ्या काढल्या जातात. वारकऱ्यांचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करून त्यांचे उत्साहात स्वागत केले जाते. या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे तिची पारंपरिक आणि शिस्तबद्ध रचना.दररोज सुमारे १०० ते ११० महिला व पुरुष वारकरी पांढरा फेटा, पारंपरिक वारकरी वेशभूषा आणि हातात वीणा घेऊन सहभागी होतात. महिला डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन चालतात.त्यांच्या मागे पहारेकरी, मृदंगवादक, टाळकरी आणि पारंपरिक वेशभूषेतील सुमारे ७५ वारकरी भक्तिमय वातावरणात दिंडीत सहभागी होतात,निमंत्रित कुटुंबांकडून दिंडीतील वारकऱ्यांचे फुलांची वर्षाव,तिलक आणि पारंपरिक पद्धतीने स्वागत केले जाते.यावेळी अंगणात विठ्ठल-विठ्ठलचा गजर आणि भजनांचा निनाद घुमतो.

दिंडीत सहभागी वारकऱ्यांसह परिसरातील नागरिकांसाठीही भोजनाची व्यवस्था केली जाते, भजन-कीर्तन आणि टाळ-मृदंगाच्या मधुर निनादाने संपूर्ण परिसर भक्तिमय होऊन जातो,खापरखेड्यातील काकडा दिंडीची ही धार्मिक परंपरा गेल्या ४० वर्षांपासून अखंड सुरू आहे. केवळ धार्मिक विधीपुरती मर्यादित न राहता वारकरी संप्रदायाची संस्कृती,भक्ती,शिस्त आणि सामाजिक एकतेचा संदेश या दिंडीच्या माध्यमातून दिला जात आहे. चार दशकांची श्रद्धा आणि भक्तीची परंपरा आजही तितक्याच उत्साहाने जपली जात असुन, खापरखेड्याची काकडा दिंडी संपूर्ण परिसरासाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

धार्मिक सलोख्याचे प्रतीक असलेल्या छठ पूजेचा भव्य सोहळा

छठ पूजा साजरी करण्यासाठी समाजसेवक आणि कामगार संघटना सामूहिक रित्या प्रयत्नशील, उत्तर भारतीय गायक आकर्षणाचे केंद्र असतील

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

उत्तर भारतीयांचा सर्वात मोठा पवित्र सण, "छठ पूजा," १५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता सुरू झाला, जिथे मावळत्या सूर्यदेवाला प्रार्थना अर्पण करण्यात आली. याप्रसंगी, माजी आमदार माणी माजी मंत्री सुनील केदार, नागपूर जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ताताई कोकार्डे, जिल्हा परिषद सदस्य ज्योती सिरस्कर, वेकोली सावनेर उपक्षेत्र व्यवस्थापक, सावनेर तालुका मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष किशोर धुंधेले, कार्यकारी अध्यक्ष दीपक कटारे, वाघोडा ग्रामपंचायतीच्या नवनियुक्त सरपंच शिप्रा खेडकर, तसेच सदस्य आणि मान्यवर उपस्थित होते.

छठ पूजा, उत्तर भारतीयांचा पवित्र सण. पहिला उत्सव १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४:०० वाजता, सूर्यदेवाच्या सूर्यास्ताच्या वेळी सुरू होईल. दुसरा उत्सव, सूर्योदयाच्या वेळी सूर्यदेवाची पूजा, १६ नोव्हेंबर रोजी पहाटे ४:०० ते सकाळी ९:०० या वेळेत होईल. या शुभप्रसंगी, हजारो उत्तर भारतीय आणि स्थानिक लोक आपल्या कुटुंबासह, भगवान सूर्याची पूजा करण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी वेकोली येथील सावनेर प्रकल्पातील छठ घाटावर येतात.

छठ पूजेच्या उत्सवादरम्यान परिसरातील आमदार आणि माजी मंत्र्यांच्या उपस्थितीमुळे आयोजकांमध्ये उत्साह संचारतो. आमदार सुनील केदार हे देखील सूर्यदेवाची पूजा करण्यासाठी प्रत्येक देवघराला भेट देतात आणि सर्व कुटुंबांना छठ पूजेच्या शुभेच्छा देतात. उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातील प्रसिद्ध गायक आकर्षणाचे केंद्र असतील. दरवर्षीप्रमाणे, वेकोलीची छठ घाट समिती सर्व युवा संघटनांसोबत मिळून हा भव्य उत्सव यशस्वी करण्यासाठी कार्यरत आहे. वेकोलीमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कामगार संघटना १५ नोव्हेंबर रोजी सूर्यास्ताच्या वेळी आणि २५ नोव्हेंबर रोजी संपावर जातील. आयोजक सर्वांना छठ पूजेच्या उत्सवात उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन करत आहेत, जो १६ नोव्हेंबर रोजी सूर्योदयाच्या वेळी समाप्त होईल, आणि छठ पूजा घाटावरील उत्सवाचा आनंद घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

युवा शक्ती विकास मंचचे अध्यक्ष श्याम चव्हाण, महेश पटवा, अशोक निंबाळकर, भालचंद्र गाझीपुरी, गुणवंत लांजेवार, कमलेश द्विवेदी, किशोर हिरकणे, मुकेश झरबाडे, अमर आणि वेकोली कामगार संघटनांचे इतर कार्यकर्ते हा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. धार्मिक सलोख्याचे प्रतीक असलेला भव्य छठ पूजा उत्सव हा छठ पूजेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

१५ व १६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या छठ पूजेच्या सोहळ्यात सर्वांनी उत्साहाने सहभागी व्हावे आणि उत्सवाचा



आनंद घेण्यासाठी छठ पूजा घाटावर पोहोचावे, अशी विनंती आयोजकांकडून करण्यात येत आहे.

या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवा शक्ती विकास मंचचे अध्यक्ष श्याम चव्हाण, वेकोली कामगार संघटनेचे महेश पटवा, अशोक निंबाळकर, भालचंद्र गाझीपुरी, गुणवंत लांजेवार, मुकेश झारबडे, राज पाटील, नीलेश धुर्वे, सुनील केशर, सुमन चंद चंद, दीपेंद्र चंदवाडे, यवतमाळ, अशोक चव्हाण आदींनी परिश्रम घेतले. श्रीराम कश्यप, संजय गौतम, राजू रविदास, सोनू सरोज, रविराज, इंगोले, सूफी मुकद्दर भाई, राजेश जैस्वाल, विश्वभर तिवारी, राजेश चव्हाण, विकास त्रिपाठी, अनिल वाघ, दामू कराळे, नरेश नागलकर, प्रभुदास पाली, इत्यादी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

थोडक्यात

दिवाळी व भाऊबीजे निमित्त जिल्ह्यातून ग्राम समृद्ध गावचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक १ करोड मिळवलेल्या धानला येथे भव्य मंडई व आमदंगल कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

बुधवार (ता.११ नोव्हेंबर) ला दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी व भाऊबीजेच्या शुभमुहूर्तावर दिवाळी व भाऊबीज निमित्त जिल्ह्यातून ग्राम समृद्ध गावचे प्रथम पारितोषिक १ करोड मिळवलेल्या धानला येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मंडई व आमदंगल कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी कुस्तीच्या आखाड्यात उतरलेल्या नामांकित पहेलवान बंधूंचे दमदार डावपेच, अफलातून कौशल्य आणि चित्तथरारक कुस्त्यांचा उपस्थित आणि मनमुराद आनंद घेतला. त्यांच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणाचे उपस्थित मान्यवरांनी मनापासून कौतुक करून सर्व पहेलवान बंधूंना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष तथा तालुका समन्वय समिती अध्यक्ष नरेश मोटघरे, चाचेर मंडळ अध्यक्ष रवींद्र चव्हाण, भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा ग्रामीण (रामटेक) उपाध्यक्ष संजू वाघमारे सह तालुक्यातील मान्यवर नेतेमंडळी, आयोजन समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य, मौदा तालुक्यातील विविध गावांतून आलेले नागरिक तसेच स्थानिक तरुण युवक मंडळाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आदर्श गणेशोत्सव मंडळाने साकारली किल्ले शिवनेरीची भव्य प्रतिकृती



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा साक्षीदार असलेल्या ऐतिहासिक किल्ले शिवनेरीची भव्य प्रतिकृती आदर्श गणेशोत्सव मंडळाच्या वतीने साकारण्यात आली आहे. खासदार शिव किल्ले स्पर्धा २०२६ अंतर्गत उभारण्यात आलेल्या या किल्ल्याचा उद्घाटन सोहळा गुरुवारी सीताबर्डी येथील टेंपल बाजार परिसरात उत्साहात पार पडला. या प्रसंगी राज्यसभा खासदार मायताई इवनाते, विधान परिषद सदस्य आमदार संजय भेंडे, प्रा खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, सचिव जयप्रकाश गुप्ता, स्पर्धेचे संयोजक अतुल गुरू, सहसंयोजक संजय बंगाले, धरमपेठ भाग कार्यवाह मोहन देशपांडे यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते. किल्ले शिवनेरीची प्रतिकृती साकारण्यासाठी धनंजय डेगवेकर, श्रीधर तितरे, कपिल मुदलियार, सूरज मुदलियार, शशांक चौरसिया, महेश चांडक, मुकेश चांडक, सात्विक, राघव उपाध्ये, गिरीश सुळे, शोभा तितरे, निकिता तितरे, राजश्री उपाध्ये आणि गौरी उपाध्ये यांनी विशेष परिश्रम घेतले. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून किल्ल्याचे उद्घाटन करण्यात आले आणि गडपूजन करण्यात आले.

यावेळी प्रा. अनिल सोले आणि आमदार संजय भेंडे यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यानंतर स्पर्धेच्या परीक्षकांनी किल्ल्याची पाहणी करून प्रतिकृतीचे निरीक्षण केले. पूर्वीच्या काळात रात्रीच्या वेळी मशालींच्या प्रकाशात किल्ला कसा दिसत असेल, याचे विशेष प्रात्यक्षिक यावेळी सादर करण्यात आले. या आकर्षक सादरीकरणाने उपस्थितांचे लक्ष वेधले. कार्यक्रमाची सांगता नेत्रदीपक आतषबाजीने झाली.

हेल्मेट घातलेले असतानाही भीषण अपघातात २१ वर्षीय युवकाचा मृत्यू!

रामटेकजवळ भरधाव पिकअपची दुचाकीला मागून धडक, धडकेनंतर चालक वाहनासह फरार

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेकजवळील नागारा तलाव परिसरात भरधाव पिकअप वाहनाने दुचाकीला मागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण



अपघातात २१ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. प्रणय उमेश कोहपरे (वय २१, रा. बोंद्री, ता. मोहाडी, जि. भंडारा) असे मृत युवकाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, प्रणय हा सावनेरजवळील येरणगाव येथे आईला सोडण्यासाठी गेला होता. तेथून दुचाकीने रामटेकमार्गे आपल्या गावी परत जात असताना सायंकाळी सुमारे ६.१५ वाजताच्या सुमारास नागरा तलावाजवळ पाठीमागून आलेल्या भरधाव पिकअप वाहनाने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे प्रणय दुचाकीसह रस्त्याच्या दुभाजकावर आदळल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

विशेष म्हणजे, अपघाताच्या वेळी प्रणयने हेल्मेट परिधान केले होते. मात्र, अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की दुभाजकावर आदळल्याने हेल्मेटचेही नुकसान झाले आणि त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर पिकअप चालक वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला. दरम्यान, त्याच मार्गाने जाणाऱ्या एका चारचाकी वाहनचालकाने माणुसकी दाखवत गंभीर जखमी प्रणयला तातडीने रामटेक उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. रुग्णालय प्रशासनाने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. या अपघातामुळे एका तरुणाचा दुर्दैवी अंत झाला असून, फरार पिकअप चालकाचा रामटेक पोलीस शोध घेत आहे.

शासकीय मुलांच्या निरीक्षण गृहात दिवाळी मिलन कार्यक्रम

विधिसंघर्षग्रस्त बालकांसोबत मान्यवरांनी साजरा केला दिवाळीचा आनंद, सुप्रसिद्ध गायकांच्या गीतांनी कार्यक्रमात रंगत





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, पाटणकर चौक, नागपूर येथे विधिसंघर्षग्रस्त बालकांसाठी दिवाळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिवाळी सणाच्या निमित्ताने निरीक्षण गृहातील बालकांना आनंद, उत्साह व आपलेपणाची भावना अनुभवता यावी, तसेच त्यांच्या मानसिक स्वास्थ्यास व व्यक्तिमत्त्व विकासास प्रोत्साहन मिळावे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

सदर कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या गीतांजली बुटी उपस्थित होत्या. यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे, बालकल्याण समितीच्या अध्यक्षा छाया राऊत, समिती सदस्य शिवशंकर सेलोकर, विनायक नंदेश्वर, विजया शहा, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण तसेच शासकीय मुलांचे निरीक्षण गृहाच्या अधीक्षिका ज्योती वाघ-पंजार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे सुप्रसिद्ध गायकांच्या आर्केस्ट्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रा. किशोर जोगळेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच ज्येष्ठ गायक मोहनजी नेर्लें, ज्येष्ठ गायिका चंदाजी नेर्लें, ज्येष्ठ गायक दीपकजी येनगल आणि उदयोन्मुख गायक संजीव साठे यांनी आपल्या सुमधुर गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सुरेल गायनामुळे कार्यक्रमात विशेष रंगत निर्माण झाली. बालकांनीही संगीताचा व मनोरंजनाचा मनमुराद आनंद घेतला.

यावेळी मान्यवरांनी बालकांशी संवाद साधत त्यांना प्रेम, आपुलकी व सकारात्मक मार्गदर्शनाचे महत्त्व पटवून दिले. बालकांना योग्य संधी, प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाल्यास ते आत्मविश्वासाने समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकतात, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

मा. आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश बालकांना सण-उत्सवाच्या माध्यमातून आनंदाचे क्षण देणे, त्यांच्यामध्ये सकारात्मक विचार, आत्मविश्वास व सामाजिक जाणीव निर्माण करणे हा होता.

या दिवाळी मिलन कार्यक्रमामुळे निरीक्षण गृहातील बालकांना दिवाळीचा आनंद अनुभवता आला. संगीत, मनोरंजन आणि मान्यवरांच्या सहवासामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात पार पडला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते एकलव्य विद्यालयाला राष्ट्रीय स्तरावर सन्मान



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक तालुक्यातील खैरी परसोडा,आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी व शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल एकलव्य मॉडेल निवासी शाळा, खैरी परसोडा, ता. रामटेक, जि. नागपूर यांना राष्ट्रीय स्तरावर गौरवपूर्ण सन्मान मिळाला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवन येथे आयोजित समारंभात एकलव्य मॉडेल निवासी शाळा, खैरी परसोडा यांना राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट एकलव्य विद्यालय म्हणून सन्मानित केले. याच वेळी महाराष्ट्राच्या आदिवासी कार्य विभागाला देखील एकलव्य मॉडेल निवासी विद्यालयांसाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सन्मान प्रदान करण्यात आला.

या समारंभात महाराष्ट्राच्या वतीने आदिवासी कार्य विभागाचे प्रमुख सचिव, नागपूर जिल्हाधिकारी,तसेच शाळेचे प्राचार्य यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या प्रसंगी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एकलव्य मॉडेल निवासी विद्यालयातील निवासी विद्यार्थ्यांशी संवादही साधला. कार्यक्रमाचे आयोजन भारत सरकारच्या आदिवासी कार्य मंत्रालयाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनजातीय गौरव पखवाडा अंतर्गत करण्यात आले होते. एकलव्य मॉडेल निवासी शाळा, खैरी परसोडा यांची ही निवड भारत सरकारच्या आदिवासी कार्य मंत्रालयाने केलेल्या मूल्यांकनाच्या आधारावर करण्यात आली आहे. विद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व संस्थागत कार्यात उत्कृष्ट कामगिरी करत ही उपलब्धी मिळवली आहे.

एकलव्य मॉडेल निवासी शाळा, खैरी परसोडा यांना राष्ट्रीय स्तरावर मिळालेला हा सन्मान जिल्ह्यासाठी व संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. ही उपलब्धी विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी आणि आदिवासी कार्य विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाप्रती असलेल्या कटिबद्धतेची साक्ष देते.

शाळांमधील नावीन्यपूर्ण उपक्रमांना मिळणार व्यासपीठ

'विद्या सेतू २०२६' स्पर्धेचे १९ व २० डिसेंबरला आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शाळांमध्ये राबविण्यात येणारे नावीन्यपूर्ण, प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रम एकमेकांपर्यंत पोहोचावेत, तसेच शाळांनी एकमेकांच्या यशस्वी प्रयोगांतून प्रेरणा घेऊन शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवावी, या उद्देशाने विद्या भारती विदर्भ, नागपूर महानगरच्यावतीने 'विद्या सेतू २०२६' या उत्कृष्ट शालेय उपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १९ व २० डिसेंबर रोजी साऊथ अंबाझरी रोडवरील बी.आर.ए. मुंडले सभागृहात होणार आहे.

'एकमेकांकडून शिकू या, सर्वांगीण शिक्षणासाठी नावीन्यपूर्ण व प्रभावी शालेय उपक्रमांची देवाणघेवाण' ही या स्पर्धेची संकल्पना आहे. प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन गटांत ही स्पर्धा होणार असून, प्रत्येक सहभागी शाळेला शिक्षक आणि विद्यार्थी अशा दोन प्रतिनिधींच्या माध्यमातून आपल्या शाळेतील उत्कृष्ट उपक्रम सादर करावा लागणार आहे. सादरीकरणासाठी सात मिनिटे आणि प्रश्नोत्तरांसाठी तीन मिनिटे असा एकूण दहा मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. सादरीकरण मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या भाषांपैकी कोणत्याही एका भाषेत करता येईल.

शैक्षणिक गुणवत्ता, विज्ञान, गणित, भाषा, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, मूल्यशिक्षण, सामाजिक बांधिलकी, पर्यावरणपूरक उपक्रम, डिजिटल नवोपक्रम, आरोग्य व कल्याण, शाळा व्यवस्थापन, समावेशी शिक्षण आणि अन्य नावीन्यपूर्ण उपक्रम अशा १४ क्षेत्रांतील उपक्रमांना स्पर्धेत सहभागी होता येईल. उपक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी, छायाचित्रे, अहवाल, विद्यार्थ्यांची कामगिरी, आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिणाम यांचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. परीक्षणासाठी उपक्रमाची समर्पकता, नवोपक्रमशीलता, सर्जनशीलता, मोजता येणारे परिणाम, सातत्य आणि सादरीकरण कौशल्य अशा निकषांवर एकूण १०० गुण दिले जातील. प्राथमिक आणि माध्यमिक या दोन्ही गटांसाठी स्वतंत्र प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय शैक्षणिक नवोपक्रम, मूल्यशिक्षण, समाजसंपर्क, विज्ञान व गणित, डिजिटल नवोपक्रम, पर्यावरणपूरक उपक्रम आणि विद्यार्थी नेतृत्व अशा विविध क्षेत्रांत विशेष सन्मानही प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी प्रवेश नोंदणीची अंतिम तारीख ५ डिसेंबर २०२६ असून, इच्छुक शाळांनी नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ९८५०३००७६५, ८३८००८३४६२ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

अवैध वाळू वाहतूक करणारा टिप्पर जप्त, १५ लाखांचा मुद्देमाल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

पारशिवनी तालुका व स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीत मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन वाहतूक सुरू आहे १२ नोव्हेंबर गुरुवारला सकाळच्या सुमारास खापरखेडा पोलिसांनी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परला ताब्यात घेऊन १५ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल भानेगाव शिवारातून जप्त केला आहे. याप्रकरणी टिप्पर चालक व मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खापरखेडा पोलीस ठाण्याचे हवालदार मुकेश महालगावे शिपाई अमित खोब्रागडेव निल गंगावणे हे भानेगाव परिसरात पेट्रोलिंग करत होते दरम्यान भानेगाव पारशिवनी टी-पॉईंटकडून वारेगावकडे अवैध रेतीची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी भानेगाव शिवारात सापळा रचून अशोक लेलँड कंपनीचा पिवळ्या रंगाचा टिप्पर क्रमांक एमएच-३५-एजी-०१३१ थांबवून झडती घेतली असता ४ ब्रास चोरीची वाळू आढळून आली बाजारभावा नुसार जप्त करण्यात आलेल्या वाळूची किमीत २४ हजार रुपये असून टिप्पर व वाळू असा एकूण १५ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलीस शिपाई अमित खोब्रागडे यांच्या फिर्यादीवरून टिप्पर चालक राजेश अंकुश सावनकर वय २८ रा. खुरसगाव, ता. सावनेर व टिप्पर मालक वीरेंद्र प्रेमलाल ठाकरे वय २७ रा. बिनासंगम या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इठर) कलम ३०३(२), ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम आणि खान व खनिज अधिनियमाच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अर्जिक्य कदम करत आहेत.

महावितरणच्या 'अभय योजने'साठी नागपूर जिल्ह्यातील ९५ हजार ग्राहक पात्र

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

वीज बिल भरता न आल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे वीजपुरवठा खंडित झालेल्या नागपूर जिल्ह्यातील हजारो घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीज ग्राहकांसाठी महावितरणतर्फे कायमस्वरूपी व तात्पुरता वीजपुरवठा खंडित असलेल्या उच्चदाब आणि लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांसाठी अत्यंत लाभदायी अशी 'अभय योजना २०२६-२७' लागू करण्यात आली असून, या विशेष योजनेमध्ये नागपूर जिल्ह्यातील तब्बल ९५ हजार ९४५ वीज ग्राहक पात्र ठरले आहेत. त्यामुळे या ग्राहकांना पुन्हा एकदा मुख्य प्रवाहात येण्याची आणि सुरळीत वीज सेवा मिळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

या महत्त्वकांक्षी योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, ग्राहकांच्या एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याजाची आणि विलंब आकाराची रक्कम १०० टक्के माफ करण्यात येणार आहे. यामुळे मूळ थकबाकीचा बोजा प्रचंड प्रमाणात कमी होणार असून ग्राहकांना केवळ मूळ रक्कम भरण्याची मुभा मिळणार आहे. ही मूळ थकबाकी एकाच वेळी किंवा हप्त्यांनी भरण्याची अत्यंत सोयीस्कर सुविधा महावितरणने उपलब्ध करून दिली आहे. योजना सुरू झाल्यापासून १५ डिसेंबरपर्यंत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा करणाऱ्या ग्राहकांसाठी 'अर्ली बर्ड रिबेट'ची विशेष सवलत जाहीर करण्यात आली आहे. याअंतर्गत लघुदाब घरगुती व व्यावसायिक ग्राहकांची वीजजोडणी ३ वर्षांपर्यंत कायमस्वरूपी खंडित असल्यास १० टक्के, तर ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून कायमस्वरूपी खंडित असल्यास तब्बल २० टक्के सवलत मिळत आहे.

तसेच, लघुदाब घरगुती व व्यावसायिक वर्गवारी वगळून इतर सर्व लघु व उच्चदाब ग्राहकांना अनुक्रमे १० टक्के व १५ टक्के सूट दिली जात आहे. ग्राहकांच्या आर्थिक सुविधेचा विचार करून, लघुदाब ग्राहकांना ५० टक्के डाऊन पेमेंट भरून उर्वरित रकमेसाठी ६ समान व्याजमुक्त मासिक हप्त्यांची सुविधा देण्यात आली आहे. तर उच्चदाब ग्राहकांना त्यांच्या थकबाकीनुसार ३ ते ६ व्याजमुक्त हप्त्यांचा लाभ घेता येणार आहे. यासोबतच, मंजूर भार २० किलोवॉटपर्यंत असलेल्या ज्या ग्राहकांनी पुनर्जोडणीच्या वेळी 'प्रीपेड स्मार्ट मीटर'चा पर्याय निवडला आहे, त्यांना मूळ थकबाकीमध्ये अतिरिक्त ५ टक्के सवलत दिली जात आहे. विशेष म्हणजे, या योजनेत सहभागी होणाऱ्या सर्व ग्राहकांसाठी पुनर्जोडणी शुल्क आणि लघुदाब ग्राहकांसाठी सर्व्हिस कनेक्शन शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे, ज्यामुळे ग्राहकांवरील आर्थिक ताण मोठ्या प्रमाणावर कमी झाला आहे.

३१ मार्च २०२६ पर्यंत कृषी आणि सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजना वगळून इतर सर्व घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या नागपूर जिल्ह्यातील १३८ उच्चदाब आणि ९५ हजार ८०७ लघुदाब अशा एकूण ९५ हजार ९४५ ग्राहकांकडे सुमारे २३८ कोटी ११ लाख ९८ हजार १७४ रुपयांची एकूण थकबाकी आहे. यातील तब्बल ५७ कोटी ५४ लाख ५० हजार ५१५ रुपयांचे व्याज व विलंब आकार या योजनेमुळे पूर्णपणे माफ होणार आहेत.

अभय योजना २०२६-२७' साठी अर्जाची प्रक्रिया अत्यंत सुलभ, पारदर्शक आणि ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. ग्राहक महावितरणच्या अधिकृत ऑनलाइन पोर्टल किंवा मोबाईल ॲपद्वारे अगदी सहजपणे आपले अर्ज सादर करू शकतील. वीज पुरवठा पूर्ववत करून घेण्यासाठी आणि आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील सर्व पात्र ग्राहकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.

जाहिर सुचना

या जाहिर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार राजू पंढरी भोयर, प्लॉट नं. ९५, फ्लॅट नं. ३७, ३८/१०१, पांडे ले-आऊट, खामला, नागपूर यांनी खालील वर्णनाची शेती खरेदीचा करारनामा हिरामन लक्ष्मणराव ठाकरे, रा. १/ए कामना नगर, कळमना मार्केट रोड, उप्पलवाडी, नागपूर यांच्याशी केलेला आहे.

स्थावर शेतजमीनीचे वर्णन:- मौजा सुकळी, प.ह.नं. ८४ अ, ता. भिवापूर, जि. नागपूर येथील शेतजमीन गट नं. एकूण आराजी जमा हक्क ८/१/२, १.०१ हे.आर. १.७३ पै. रु. भो. वर्ग १ (गट पूर्ण) ही संपूर्ण शेतजमीन गट नं. ८/१/२ ची चतुर्दिसिमा:- पूर्वेस:- रस्ता पश्चिमेस:- गट नं. ६, ७ व १० उत्तरेस:- गट नं. ९ दक्षिणेस:- गट नं. ५, १४६ व १४५ अशी आहे.

करिता या शेत जमिनीबाबत कुणाचाही काही दावा, बोझा, हक्क, उजर, गहाण असल्यास जाहिर सुचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कागदपत्रांसह संपर्क साधावा. मुदतीनंतर कुणाचा काहीही आक्षेप नाही असे गृहित धरून पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. १४ नोव्हेंबर २०२६

- संपर्क -

ॲड. प्रकाश एम. खाटीक

५०, शिवकृपा, गजानन नगरी, ओम पॉलिटेक्निक जवळ, परसोडी, उमरेड, जि. नागपूर

मो. क्र. ९२२६४९१६७५, ९९२३७२०३७६